❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. ०५ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २२१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन

## वयाच्या ९०व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास; शिक्षण, आरोग्यासह क्रीडा क्षेत्रावर शोककळा

■ कोल्हापूर (दै. संध्या)

देशातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे शिक्षणमहर्षी, पद्मश्री पुरस्कार विजेते आणि बिहार तसेच त्रिपुराचे माजी राज्यपाल डॉ. ज्ञानदेव यशवंतराव (डी. वाय.) पाटील यांचे मंगळवारी कोल्हापुरात वृद्धापकाळाने निधन झाले. ते 90 वर्षांचे होते. सोमवारी रात्री त्यांची प्रकृती खालावली होती. बुधवारी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि समाजसेवा या क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने राज्यासह देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार उच्च शिक्षण पोहोचवण्याचा त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला.



22 ऑक्टोबर 1935 रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आंबप येथे एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या डॉ. पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प केला. त्यातून पुढे त्यांनी देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांचे जाळे उभारले. सार्वजनिक जीवनाची सुरुवात त्यांनी काँग्रेस पक्षातून केली. 1957 ते1962 या काळात ते कोल्हापूरचे महापौर होते. त्यानंतर 1967 आणि 1972 मध्ये पन्हाळा विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. मात्र, पुढे सक्रिय राजकारणापासून दूर जात त्यांनी संपूर्ण लक्ष शिक्षण क्षेत्राच्या उभारणीकडे केंद्रित केले. 1983 मध्ये नवी मुंबई येथे 'रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (RAIT)'ची स्थापना करून त्यांनी शैक्षणिक प्रवासाला सुरुवात केली. पुढे त्यांच्या नेतृत्वाखाली डी. वाय. पाटील समूहाने देशभरात शिक्षणसंस्थांचे मोठे जाळे उभे केले. आज या समूहांतर्गत कोल्हापूर, पुणे, नवी मुंबईसह विविध शहरांमध्ये डीम्ड विद्यापीठे, खासगी विद्यापीठे आणि 180 हून अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. अभियांत्रिकी, वैद्यकीय, दंतवैद्यकीय, फार्मसी, व्यवस्थापन, नर्सिंग, कृषी, आर्किटेक्चर, कायदा अशा विविध शाखांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नवी मुंबईतील जागतिक दर्जाचे डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियम हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक मानले जाते. या स्टेडियममध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने, आयपीएल, फुटबॉल स्पर्धा आणि अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन झाले आहे. याशिवाय वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये आणि आरोग्य सेवा संस्थांच्या माध्यमातून त्यांनी आरोग्य क्षेत्रातही मोठे योगदान दिले. शिक्षण आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल भारत सरकारने 1991 मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. याशिवाय देश-विदेशातील अनेक विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट आणि 'डी.लिट.' पदव्या बहाल केल्या.

### राज्यपाल म्हणूनही भूषवली जबाबदारी

शिक्षण क्षेत्रातील योगदानासोबतच त्यांनी घटनात्मक पदावरही काम केले. 2009 ते 2013 या कालावधीत ते त्रिपुराचे राज्यपाल होते. त्यानंतर 2013 ते 2014 या काळात त्यांनी बिहारच्या राज्यपालपदाची जबाबदारी सांभाळली. काही काळ पश्चिम बंगालच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही त्यांनी सांभाळला.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही व्यक्त केला शोक

डी. वाय. पाटील ग्रुपचे संस्थापक, त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास महापौर, लोकप्रतिनिधी आणि पुढे विविध राज्यांचे राज्यपाल अशा महत्त्वाच्या घटनात्मक पदापर्यंत पोहोचला. शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून समाजातील सर्वसामान्य आणि गरजू विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविण्यासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. शिक्षण आणि वैद्यकीय संस्थांचे जाळे उभारण्याबरोबरच त्यांनी नवी मुंबईत जागतिक दर्जाचे क्रीडा संकुल साकारले, तसेच कृषी व सामाजिक क्षेत्रातही आपल्या कार्याचा ठसा उमटविला. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या निधनाने एक दूरदर्शी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### डॉक्टर असणारा पर्यटक खोल दरीत कोसळला

सिंधुदुर्ग : दैनिक संध्या

सिंधुदुर्ग जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. आंबोलीमधील महादेव गड पॉईंटमधून पर्यटक दरीत कोसळल्याची घटना घडली आहे. सायंकाळी साडेपाच्या सुमारास ही घटना घडली आहे. 400 फुट खोल दरीत पर्यटक कोसळल्याची माहिती समोर आली आहे. आयुब सय्यद राहणार निपाणी असे दरीत कोसळलेल्या पर्यटकाचे नाव आहे. सह्याद्री ॲडव्हेंचर रेस्क्यू टीम आंबोली-सांगेलीकडून शोधमोहीम सुरु आहे. पर्यटक खोल दरीत कोसळल्याने व पाऊस अन् धुकं, काळोख झाल्याने ही मोहीम उद्या सकाळी 6 वाजा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. आंबोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी घटनेची माहिती घेतली आहे. दरीत कोसळलेला पर्यटक पेशाने डॉक्टर असल्याचीही माहिती मिळत आहे.

### भावजयीसह तिघांवर गुन्हा दाखल

पुणे : दैनिक संध्या

कौटुंबिक वादातून भावजयीने अवघ्या नऊ महिन्यांच्या निष्पाप बालकाच्या तोंडात फेव्हिक्विक ओतल्याची धक्कादायक आणि चीड आणणारी घटना लोहगाव येथील कलवड वस्तीत उघडकीस आली आहे. फेव्हिक्विकमुळे बालकाच्या तोंडात गंभीर अंतर्गत जखमा झाल्या असून, त्याच्यावर ससून रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी अल्ताफ नबी शेख (वय ३९, रा. कलवड वस्ती, लोहगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार लोहगाव पोलिस ठाण्यात भावजयीसह तिच्या मुंबईतील दोन नातेवाइकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सानिया शेख (रा. कलवड वस्ती, लोहगाव), रियाज इमाम हल्याळ (वय ४८) आणि हाजी मलंग शेख (दोघे रा. कांदिवली, मुंबई) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्ताफ शेख आणि त्यांचा भाऊ लोहगावमधील कलवड वस्तीत एकत्र राहतात. काही दिवसांपासून किरकोळ कारणावरून कुटुंबात वाद सुरू होते. ३१ जुलै रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास अल्ताफ कामावर गेलेले असताना, भावजय सानिया हिने कौटुंबिक वादातून अल्ताफ यांच्या नऊ महिन्यांच्या मुलाच्या तोंडात फेव्हिक्विक ओतले. बालकाची आई जैनब यांच्या हा प्रकार लक्षात येताच त्यांनी घाबरून पतीला फोनवरून माहिती दिली. बालकाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### ट्रिपल सीट, विनानंबर वाहनांचा सुळसुळाट

पुणे : दैनिक संध्या

शहरातील कानाकोपऱ्यात ट्रिपल सीट प्रवास, विरुद्ध दिशेने सुसाट येणारी वाहने, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे आणि नंबर प्लेट नसलेल्या संशयास्पद वाहनांचा सुळसुळाट झाला आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, वाहतूक शाखेने अशा बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. शहरातील प्रमुख रस्ते, उड्डाणपूल तसेच उपनगरांतील चौक सध्या बेशिस्त वाहनचालकांचे केंद्र बनले आहेत. दुचाकीवरून सर्रास तीन-तीन जण (ट्रिपल सीट) प्रवास करताना आढळतात.

# इतिहास बदलण्याचा प्रयत्न

## राहुल गांधी : पंतप्रधानांनी सरकारच्या कामांसाठी माफी मागावी

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी सांगितले की, देशातील विद्यार्थी गंभीर वेदनेत आहेत. त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या माफीची गरज नाही, तर पंतप्रधान त्यांच्या सरकारच्या कामांसाठी त्यांची माफी मागावी अशी त्यांची इच्छा आहे. माजी खासदार वायको यांच्या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात राहुल गांधी म्हणाले की, विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत, कारण RSS देशाचा इतिहास बदलण्याचा प्रयत्न करत आहे. ते म्हणाले की, भारत आपला इतिहास चिरडला जाणे सहन करणार नाही.



राहुल म्हणाले की, आपण एका विचित्र टप्प्यातून जात आहोत, जिथे विद्यार्थी रस्त्यावर आहेत आणि खूप वेदनेत आहेत. त्यांच्याकडे काम नाही आणि ते परीक्षांमध्ये निष्पक्षता तसेच चांगल्या शिक्षण प्रणालीची मागणी करत आहेत. दुसरीकडे, पंतप्रधान त्यांना माफ करत आहेत. राहुल म्हणाले की, पंतप्रधान त्यांना किंवा भारताच्या भविष्याला माफ करू शकतात, ही कल्पना त्यांना कुठून येते हे त्यांना माहीत नाही. राहुल गांधींनी दावा केला की, पंतप्रधान किंवा RSS च्या मागे एक धोकादायक विचार आहे की हा देश अनेक लोकांची अभिव्यक्ती नाही. ते म्हणाले की, संविधानात स्पष्ट लिहिले आहे की, इंडिया म्हणजेच भारत राज्यांचा एक संघ आहे आणि राज्ये भारतातील लोकांची अभिव्यक्ती आहेत. राहुल म्हणाले की, काही अज्ञानी लोक आहेत जे तमिळ, मराठी, बंगाली लोकांना समजत नाहीत आणि म्हणतात की, यापैकी कोणताही इतिहास आणि कल्पना प्रासंगिक नाही. त्यांचे मत आहे की, केवळ तोच इतिहास महत्त्वाचा आहे जो RSS मानतो. याच कारणामुळे ही लढाई महत्त्वाची आहे आणि विद्यार्थी रस्त्यावर आहेत.

# सुनेत्रा पवारांचा नव्हे तमाम माता-भगिनींचा अपमान

## ‘इतक्या खालच्या स्तराला जाणारे पहिल्यांदाच पाहिले’ : फडणवीसांचे प्रत्युत्तर

■ मुंबई (दै. संध्या)





राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसने सोशल मीडियावर केलेल्या 'गुंगी गुडिया' या टिप्पणीवरून राज्यातील राजकारण चांगलेच पेटले आहे. या वक्तव्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत समाचार घेत काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तराला जाणारे हे आता आपल्याला पहिल्यांदाच पहायला मिळत असल्याची प्रतिक्रिया फडणवीसांनी दिली आहे. तर महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांचा अपमान म्हणजे महाराष्ट्रातील तमाम माता-भगिनींचा आणि लाडक्या बहिणींचा अपमान, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले, मला असे वाटते की अतिशय खालच्या स्तरावर हे उतरले आहेत. मुळात यांना कुठलाही रिस्पॉन्स मिळत नाही, कोणी विचारात नाही, त्यामुळे न्यूजमध्ये येण्यासाठी अशा पद्धतीचे काम चालले आहे. 'बदनाम हुए तो क्या हुआ, नाम तो हुआ', अशा पद्धतीने यांची कारवाई सुरू आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तराला जाणारे हे आपल्याला पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे, अशी टीका फडणवीस यांनी केली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर बोलताना तीव्र संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांचा अपमान म्हणजे महाराष्ट्रातील तमाम माता-भगिनींचा आणि लाडक्या बहिणींचा अपमान आहे. महिलांच्या सन्मानाच्या नावाने राजकारण करणाऱ्या काँग्रेसचा आज खरा चेहरा महाराष्ट्राने पाहिला आहे. राजकीय विरोध करा, पण महिलांचा अपमान करून राजकारण करण्याची ही काँग्रेसची संस्कृती आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करण्याच्या नादात काँग्रेसने संपूर्ण महिला शक्तीचाच अवमान केला आहे. हा अपमान महाराष्ट्रातील स्वाभिमानी महिला कधीही विसरणार नाहीत. महिलांचा सन्मान करणाऱ्या महाराष्ट्रात अशा प्रकारची भाषा कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही.

यावेळी एकनाथ शिंदे यांनी 'लाडकी बहीण' योजनेचाही उल्लेख करत काँग्रेसवर निशाणा साधला. 2024 मध्ये महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींनी काँग्रेसला लोकशाही मार्गाने उत्तर दिले होते. महिलांचा अपमान करणाऱ्यांना पुन्हा एकदा जनताच धडा शिकवेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# ‘सक्षम कौशल्य जनगणना’ कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

■ मुंबई (दै. संध्या)

*मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या ‘सक्षम कौशल्य जनगणना’ या अभिनव उपक्रमाच्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री मंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबई उपनगर चे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यावेळी उपस्थित होते.*




‘सक्षम कौशल्य जनगणना’ हा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला देशातील पहिला एआय-सक्षम हायपरलोकल कौशल्य जनगणना उपक्रम आहे. रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधींसाठी सविस्तर कौशल्य डेटा तयार करण्याचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५९,८२४ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून ४४,९८२ उमेदवारांची नोंद, १,०१८ नियोक्ते आणि ५२ प्रशिक्षण संस्थांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. या सर्वेक्षणातून बेरोजगार, कौशल्यवृद्धी इच्छुक, स्वयंरोजगारासाठी इच्छुक; तसेच गृहिणींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती संकलित करण्यात आली आहे. ‘सक्षम कौशल्य जनगणना’मुळे उपजीविका आणि रोजगारनिर्मितीला नवी दिशा

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या ‘सक्षम कौशल्य जनगणना’ या अभिनव उपक्रमामुळे रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार क्षेत्रात महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येत आहेत. या जनगणनेतून रोजगारक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यातील तफावत स्पष्ट झाली असून, भविष्यातील नियोजनासाठी भक्कम पाया तयार झाला आहे. जनगणनेदरम्यान सर्वेक्षण करण्यात आलेल्या जवळपास ९८ टक्के नागरिकांकडे औपचारिक कौशल्य प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले. रोजगारक्षमता आणि कार्यबलाच्या औपचारिकीकरणातील ही मोठी दरी भरून काढण्यासाठी ‘सक्षम’ उपक्रम प्रभावी ठरत आहे. सर्वेक्षणानंतर ३२ हजारांहून अधिक उमेदवारांना वैयक्तिकृत करिअर मार्गदर्शन देण्यात येणार आहे. बाजारपेठेच्या गरजांनुसार २२ हजारांहून अधिक उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणाशी जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय ५ हजार ८०० हून अधिक बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधींशी जोडण्याची प्रक्रिया सुरू असून, १ हजार ६९० हून अधिक उमेदवारांशी नियोक्त्यांनी मुलाखती व भरतीसाठी थेट संपर्क साधला आहे. स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ४ हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना संरचित प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि व्यवसाय सल्ला दिला जाणार आहे; तसेच ६ हजारांहून अधिक गृहिणी, दिव्यांग व्यक्ती आणि समाजातील वंचित घटकांना औपचारिक उपजीविका, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे. सीएसआर-समर्थित प्रशिक्षण भागीदारी, सातत्यपूर्ण नियोक्ता सहभाग, नियमित रोजगार मेळावे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित धोरणात्मक विश्लेषणामुळे रोजगारनिर्मितीची प्रक्रिया अधिक गतिमान आणि लक्ष्याधारित झाली आहे. विशेष म्हणजे, मुंबई उपनगरचे वार्षिक कौशल्य व रोजगार उद्दिष्ट ८०० ते १,००० उमेदवारांचे असताना, ‘सक्षम’च्या एका पथदर्शी वॉर्ड प्रकल्पातूनच सुमारे २२ हजार उमेदवारांसाठी उपजीविका तयार करण्यात आली आहे.

या उपक्रमाच्या पुढील टप्प्यात वॉर्डस्तरीय साप्ताहिक रोजगार मेळावे, नियोक्त्यांच्या सहभागातून क्षेत्रनिहाय अल्पकालीन व दीर्घकालीन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच स्वयंरोजगार इच्छुकांना पीएमईजीपी, मुद्रा, यांसारख्या योजनांशी जोडण्यावर भर दिला जाणार आहे. व्यवसाय नियोजनासाठी मेंटर गटांची स्थापना, उद्योजकता इनक्युबेशन केंद्रांशी भागीदारी, सातत्यपूर्ण कौशल्य डेटाबेस अद्ययावत ठेवणे, प्रत्येक उमेदवाराला करिअर मार्गदर्शन देणे आणि विविध शासकीय अप्रेंटिसशिप व रोजगार योजनांशी उमेदवारांना जोडण्याची कार्यवाही ही हाती घेण्यात येणार आहे. या सर्व कार्यवाहीची माहिती कॉफी टेबल बुक मध्ये आहे.



### १५० कोटींची फसवणूक


■ पिंपरी चिंचवड (दै. संध्या)

पिंपरी चिंचवडमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. सायबर फसवणुकीसाठी 'म्युल अकाउंट' पुरवणाऱ्या रॅकेटचा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीने देशभरातील तब्बल 65 नागरिकांची 150 कोटी रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याचं, आत्तापर्यंतच्या तपासात निष्पन्न झालं आहे. या प्रकरणी आळंदी पोलिसांनी एकाला अटक केली असून टोळीतील इतरांचा शोध सुरु आहे. फसवणूक करण्यासाठी ‘म्युल अकाउंट’ अर्थात बँक खाती उपलब्ध करुन देणारी ही टोळी आहे. याचं टोळीतील सचिन संजय काळे या 25 वर्षीय ठगाला अटक करण्यात आली आहे. त्याच्या नावावर विविध बँकांमध्ये 9 खाती उघडण्यात आलेली आहेत, ज्यामधून सायबर फसवणुकीची रक्कम फिरवली जात होती. एनसीआरपी पोर्टलवरील माहितीनुसार, या रॅकेटद्वारे देशातील 65 नागरिकांची तब्बल 150 कोटी रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. यापैकी आरोपीच्या विविध खात्यांमध्ये 1 कोटी 15 लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचेही समोर आलं आहे. आता आळंदी पोलिसांकडून या टोळीतील इतर साथीदारांचा शोध सुरु आहे. त्यामुळं फसवणूक झालेल्यांचा आणि रकमेचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# संपादकीय

## धरणी कापे थरथर

धक्के आणि हादरे राज्याला नवे नाहीत. परंतु, आता विषय राजकीय नव्हे, तर खऱ्याखुऱ्या धक्क्यांचा, अर्थात भूकंपाचा आहे. गेल्या आठवड्यात पालघर, हिंगोली, नाशिकसह काही जिल्हे भूकंपाने हादरले. हे धक्के सौम्य असल्याने कदाचित – प्रभावित भागाचा अपवाद वगळता – शासनासह अन्य कोणी ते गांभीर्याने घेतले नसावेत. परंतु, याच काळात देशाच्या इतर भागांत आणि हजारो किमी अंतरावरील जपानमध्येही तीव्र धक्के जाणवले. हा केवळ योगायोग की भूगर्भातील हालचालींचा एकमेकांशी काही संबंध आहे, याचा शोध घ्यायला हवा. कळवण, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर आणि दिंडोरी या तालुक्यांना पंधरा धक्के बसल्याने नाशिकही घबराटीच्या कंपनांनी थरथरले. चार-पाच दिवस कंपने जाणवली. शेतांना भेगा पडल्या, घरांना तडे गेले, तर भूस्खलनही झाले. तरी प्रशासनाच्या मते, त्यांची तीव्रता सौम्य ते मध्यम स्वरूपाची होती. राज्याच्या इतिहासात १९९३ मधील किल्लारीच्या प्रलयंकारी भूकंपाचा अपवाद वगळता, अशा मोठ्या आपत्तीची नोंद नाही. परंतु, तीस-बत्तीस वर्षांनंतरही तेव्हाचे चित्र आठवले तरी मनात धस्स होते. या आपत्तीमुळे लातूर व धाराशिव हे जिल्हे संवेदनशील मानले जातात. कोयना, वारणा परिसरातही धरणांशी संबंधित धक्के जाणवत असतात. मुंबईसह कोकण, ठाणे, पुणे आणि नाशिक परिसरालाही कमी तीव्रतेचे धक्के अधेमधे बसत असतात, ते सह्याद्रीच्या विस्तीर्ण डोंगररांगा, भूजलाचा दाब आणि भूगर्भातील प्लेट्समुळे. भारतीय भूवैज्ञानिक विभागाचा अहवालच तसे सांगतो. परंतु, या खेपेला धक्क्यांचे केंद्र बदलल्याचे सांगितले जाते. कळवण तालुक्यातील दळवटऐवजी ते दिंडोरी-सुरगाण्याकडे सरकले. परंतु, शास्त्रीय अभ्यासाच्या अभावामुळे त्याचाही खुलासा झालेला नाही. पावसाळ्यात जमिनीखालील 'फॉल्टलाइन'च्या



बेसाल्ट खडकांमध्ये पाणी मुरून, घर्षण होऊन कंपने जाणवतात. आता प्रश्न आहे करावयाच्या उपायांचा. राज्याला हादरे बसूनही ते मंत्रालयापर्यंत पोचत नाहीत. वरवरच्या उपाययोजना वा प्रभावित भागांत जनजागृती करण्यापलीकडे फारसे काही घडत नाही. दुर्घटनेपूर्वी लोक सतर्क होऊ शकले तर जीवितहानी टाळता येऊ शकते. उपाय, स्थलांतर, प्रशिक्षण आदींचे ढोबळ आराखडे तरी तयार असायला हवेत. तयारीअभावी, दुर्दैवाने हानी झालीच तर हातावर हात ठेवून बसण्याशिवाय पर्याय नाही. आपत्ती व्यवस्थापन विभाग महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांकडे बोट दाखवतात, तर या संस्था अशा वेळी सरकारकडे बोट दाखवून हात झटकतात. खड्डे दुरुस्तीतच त्यांची दमछाक होत आहे, तेव्हा नैसर्गिक आपत्तींचा विचार केव्हा आणि कसा करणार? बहुधा त्यांची काही कंत्राटे असती तर विचार होऊ शकला असता! डिजिटल भूमापन केंद्रांच्या अभावामुळे भूकंपाचे केंद्र लवकर लक्षात येत नाही. राज्यात सर्वत्र अशा वेधशाळा उभारल्या जाणार, असे वर्षानुवर्षे सांगितले जाते. पुणे विभागात आठ, तर कोकण व मराठवाड्यात प्रत्येकी चार केंद्रे अस्तित्वात येणार होती. मात्र, हा प्रकल्पच गुंडाळला गेला. गंभीर व संवेदनशील विषय निकाली काढण्याची परंपरा येथेही कायम राहिली. आता म्हणे, धरण क्षेत्रांत ही यंत्रे बसवली जाणार आहेत. भूकंपाच्या धक्क्यांचा धरणावर काय परिणाम झाला हे त्यामुळे समजू शकेल. धरणसुरक्षा महत्त्वाचीच. परंतु, जनसुरक्षेचे काय? प्रभावित परिसरातून आरडाओरडा झाल्यानंतर 'नॅशनल सिस्मॉलॉजिकल नेटवर्क'तर्फे (एनसीएन) चार भूकंपमापक यंत्रे बसवली जाण्याची घोषणा झाली. लोकांच्या जीविताच्या प्रश्नांवर कधीतरी घोडे वरातीपूर्वी दामटायला काय हरकत? बाकी येत्या काळातही भूकंपाची वृत्ते येत राहतील. परंतु, अशा आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी आपण सज्ज आहोत काय, याचे 'होय' असे खात्रीशीर उत्तर कोणीच देऊ शकणार नाही. आणि कितीही हादरे बसले तरी ते उत्तर मागण्याचा प्रयत्न जनता करणार नाही. पुन्हा एकदा जिवावर बेतत नाही, तोवर हादऱ्यांबाबत हालचाल होणार नाही, हेच वास्तव.

## संस्कृत सुभाषित

सदा लोकहिते युक्ता: रत्नदीपा इवोत्तमा: ।।

अर्थ : लोककल्याणात रममाण झालेले लोक रत्नाच्या दिव्याप्रमाणे कशाचीच अपेक्षा धरत नाहीत, तर ते दुसऱ्यासाठीच तेवत असतात.

## गुरु वचन

### सुखी जीवनाची चार सुत्रे

जगातल्या कुठल्याही प्रश्नावर समाधान नाही असे होऊच शकत नाही. त्यात मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे निष्ठा व प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सर्व शक्य आहे. जीवनाला उपयुक्त बनवण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्याचा जीवनात समावेश केल्यामुळे बहुतांशी अडचणी सुटू शकतात. या चार गोष्टींना जीवनाचे सार म्हटले जाऊ शकते. सर्व विकारांचा त्याग, कपट सोडून साधेपण स्वीकारणे, बंधनातून मुक्त होण्याचे साहस व जीवनात अध्यात्मवादाचा समावेश केला तर मानवाचे व्यर्थ जीवन उपयुक्त बनेल. त्याच्या जीवनात आनंद व उल्हास, शांती व समाधानात वाढ होईल.

विकार मानव जीवनातील सर्वात मोठा अडथळा आहे. हा दोष मानवाला फक्त विकृती देतो. मानवास उदारता, दान, दया, प्रेम किंवा करुणा प्रवृत्तींपासून वंचित करतो म्हणून त्याच्या भौतिक इच्छा एवढ्या वाढतात की, संग्रह करण्यात त्यास योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, आपले–त्रयस्थ, शोषण–पोषण कशाचेच भान राहत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, सर्व मर्यादा व धोरणं व्यर्थ वाटू लागतात. अशा विकारी मानवाच्या जीवनात शोक–संताप व अशांती, असंतोषाशिवाय दुसरे काय मिळू शकते? विकृती मानवाचा फार मोठा दोष आहे, याचा त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मानवासाठी दोन अलंकार मानले गेले आहेत. ते अंगीकारण्यातच त्याचे भले आहे. उदारतेचा गुण आपल्या इतर गुण त्यागांना प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्यापेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह, धोरण व आदर्शाविरुद्ध नाही. उदारता परमार्थासाठी अर्जित केली जाते. उदार पुरुष निती नियमाने मिळवलेल्या पैशाने सुखी व समाधानी असतो. अशा लोकांचे प्रश्न आपोआप सुटतात.

## उपदेशकथा

### कृतज्ञता

एका गावात एक वृद्ध शेतकरी राहात होता. त्याला मूलबाळ काही नव्हते म्हणून तो दु:खी जीवन जगत होता परंतु आपले मन प्रसन्न रहावे म्हणून त्याने अनेक पशूंना पाळले होते. शेतावर जेवढे काम करता येईल तेवढे काम करायचा अन् बाकीचा वेळ विश्रांती घेत घालवायचा. एक दिवस असाच जंगलातून इकडे तिकडे फिरताना त्याला एक माकडवाला दिला. त्याच्या पिंजऱ्यात एक माकडाचे पिलू मरणावस्थेत दिसले. त्याने ते सोडवले. त्या पिलाला आपल्या घरी आणले. त्याला दूध पाजले. त्याची थोडी देखभाल केली. हळूहळू त्याची तब्बेत सुधारू लागली. माकडाच्या पिलाला त्याचा लळा लागला. ते वृद्ध शेतकऱ्याच्या लहान सहान कामी उपयोगी पडू लागले. ते पाहून शेतकरी खूश झाला. त्या शेतकऱ्याजवळ नाही म्हटले तरी थोडे धन होते. चोरांना त्याचा सुगावा लागताच एका रात्री त्यांनी त्याच्यावर धाड घातली. एक चोर शेतकऱ्याच्या छातीवर बसून त्याला मारायला लागला. बाकीचे चोर पैसे शोधू लागले. त्या माकडाच्या पिलाने ते पाहिले. त्याने जोरात आरडाओरडा करावयास सुरुवात केली. तो आवाज ऐकून आजूबाजूचे लोक धावत आले. त्या माकडाच्या पिलाने छातीवर बसलेल्या चोराला सळो की पळो करून सोडले. चोर पळू लागले पण लोकांनी त्यांना अखेर पकडलेच. लोकांनी त्या माकडाच्या पिलाचे फार कौतुक वाटले. त्याच्या हुशारीमुळे चोर पकडले गेले व शेतकऱ्याचा जीव वाचला.

कथा उपदेश : परोपकाराचे फळ कधी ना कधी तरी मिळतेच.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:अश्विनी |
| ५ ऑगस्ट २०२६ | २१:१७:५२ |
| बुधवार | योग:शूल १७:२८:१८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि ०९:२६:४६ |
| आषाढ शके | करण:बव २०:४२:३६ |
| संवत्– १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मेष |
| अयन– दक्षिणायन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – सफर |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – २१ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:सप्तमी २०:४२:३६ | कालाष्टमी |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 7 | | 4 | 9 | |
| | | 7 | 2 | | 8 | 3 | 1 | |
| | 8 | | 1 | 4 | | | | |
| 2 | 1 | 9 | 6 | | | | | |
| 6 | 5 | | | 3 | | | 7 | 9 |
| | | | | | 5 | 8 | 6 | 2 |
| | | | | 9 | 1 | | 3 | |
| | 2 | 1 | 3 | | 6 | 9 | | |
| | 3 | 6 | | 2 | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०३० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 2 | 3 | 7 | 5 | 6 | 9 | 1 |
| 1 | 5 | 7 | 9 | 6 | 4 | 3 | 2 | 8 |
| 3 | 9 | 6 | 1 | 8 | 2 | 4 | 7 | 5 |
| 9 | 1 | 8 | 7 | 2 | 3 | 5 | 4 | 6 |
| 7 | 2 | 5 | 6 | 4 | 1 | 8 | 3 | 9 |
| 6 | 3 | 4 | 8 | 5 | 9 | 2 | 1 | 7 |
| 2 | 4 | 1 | 5 | 9 | 8 | 7 | 6 | 3 |
| 8 | 7 | 3 | 2 | 1 | 6 | 9 | 5 | 4 |
| 5 | 6 | 9 | 4 | 3 | 7 | 1 | 8 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११०० – हेन्री पहिला ईंग्लंडच्या राजेपदी.
- १३०५ – स्कॉटिश क्रांतीकारी विल्यम वॉलेस ग्लासगो जवळ पकडला गेला.
- १८६० – कार्ल चौथा स्वीडनच्या राजेपदी.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – युद्धाच्या खर्चास हातभार लागावा म्हणून अमेरिकन सरकारने प्रथमत–आयकर लागू केला.
- १८८२ – जपानमध्ये लश्करी कायदा लागू.
- १९०१ – पीटर ओ'कॉनोरने २४ फूट ११.७५ ईंच लांब उडी मारून विश्वविक्रम रचला.

### राष्ट्रीय

- २००६ – मराठी विकिपिडीयाने ५,००० लेखांचा टप्पा ओलांडला.
- २००७ – प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, दिग्दर्शक केदार शिंदे, अभिनेता भरत जाधव यांच्यासह १३ जणांना आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठानतर्फे आचार्य अत्रे पुरस्कार जाहीर झाला.
- २००८ – दिल्ली उच्च न्यायालयाने शिक्षण क्षेत्रात मुस्लिम विद्यार्थ्यांना आरक्षण देण्याची सशर्त परवानगी आंध्र प्रदेश सरकारला दिली.

### जन्म

- १९२३ – दीवान नायर, सिंगापुरचे राष्ट्राध्यक्ष.
- १९३० – मायकल कोवाक, स्लोवाकियाचे राष्ट्राध्यक्ष.
- १९७५ – काजोल देवगण, बॉलीवुड अभिनेत्री.
- १९७५ – जेलीना डीसुझा, बॉलीवुड अभिनेत्री.

### निधन

- ८८२ – लुईस तिसरा, फ्रान्सचा राजा.
- १३६४ – कोगोन, जपानचा राजा.
- १७९२ – फ्रीड्रीक नॉर्थ, युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान.
- १९६० – ऑर्थर मेघेन, कनाडाचे नववे पंतप्रधान.

## : SMS :

Teacher: Chintu batao, agar 2+2=4 hota hai to 2+2+2 kitna hoga?

Chintu: Sir, bahut zyada hoga

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.९ | २४.१ |
| अहमदनगर | ३०.३ | २३.४ |
| अकोला | ३८.४ | २६.२ |
| अमरावती | ३८ | २६ |
| बीड | ४०.६ | २९.७ |
| भंडारा | ३९.७ | २७ |
| बुलढाणा | ४२.९ | २७.४ |
| चंद्रपूर | ३९.४ | ३० |
| चेन्नई | ४२.५ | ३०.५ |
| नवी दिल्ली | ४३.१ | ३१.८ |
| धुळे | ३३.४ | २५.५ |
| गोंदिया | ३८.५ | २६.७ |
| जळगाव | ३७ | २५.५ |
| कोल्हापूर | २६.८ | २३.४ |
| लातूर | ३२ | २४.२ |
| मुंबई | ३४.२ | ३१.४ |
| नागपूर | ३९.२ | २७ |
| नांदेड | ३५.८ | २५.८ |
| नंदूरबार | ३१.१ | २४.७ |
| नाशिक | २७ | २४ |
| पुणे | २६.२ | २२.९ |
| पंढरपूर | ३३.८ | २४.६ |
| सातारा | ३०.७ | २३.४ |
| सांगली | ३० | २३.९ |
| सोलापूर | ३३.२ | २४.८ |
| वर्धा | ३९.२ | २६.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** मेष: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणीं पार पाडताल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण कामात हस्तक्षेप करू नका. व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील. व्यापारात स्पष्टपणा राखा.

**सिंह :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही.

**तुळ :** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा: उत्तर नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल.


**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम रोजगारामध्ये बदल किवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. आपले मन उत्साहित राहील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३१



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा, १५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान, ५३. बस्तान
५४. मज्जाव, ५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी, ६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३० चे उत्तर

आडवे उत्तर : १.जंगल ३.आवाहन ६.दमा ८.पराजय ११.तानसेन १२.शाळामास्तर १४.मन १५.तुरट १९.दरवाजा २१.नीज २२.गत २४.रसा २६.नारद २८.मालामाल २९.गजानन ३१अ.दुआ ३३.पळस ३४.टवाळ ३५.मलमास ३७.पान ३८.घन ३९.रडारड ४०.आरसा ४२.साल ४३.मम ४४.गुण ४५.ताप ४६.यमल ४८.माजघर ५०.कयास ५२.कपट ५३.तसदी ५५.मायावती ५७.चरा ५८.धंदा ५९.नटखट ६०.मज्जाव ६१.आभार ६३.रसद ६५. समाधान ६७.वजन ६९.लयास जाणे ७१.मालक ७३.नीरद ७५.कासार ७७.मस ७९.छू ८०.ओळखणे ८१.गवत ८२.टणक ८३.पाताळ ८४.वाद

उभे उत्तर : १.जंगली २.लता ३.आ सेतु हिमाचल ४.वानर ५.नशा ६.दम ादमान ७.मास्तर ९.राम १०.जननी १३.रवाना १६.नग १८.टर २०.जारणमारण २३.तमासगीर २५.सागवान २७.संपत्ती ३०.जाळ ३१.नमन ३२.आखाडसासरा ३४.टपाल ३६.सडा ३८.घमघमाट ४०.आपपरभाव ४१.साय ४२.सालस ४३.मज ४५.ताक ४७.मतदार ४९.रया ५१.याचना ५४.दीनदयाळ ५६.वर्तमानकाळ ६०.मन मारणे ६२.रजनीकांत ६४.सल ६६.अकलमंद ६८.नर ७०.जास्त ७२.तवंग ७४.दमट ७६.साखर ७८.सण ८०.ओळ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे

TEACH FOR INDIA

## टीच फॉर इंडियाकडून ‘काहीतरी मोठे’ घडवण्याची संधी

**पुणे : दैनिक संध्या**

देशातील प्रत्येक मुलाला उत्कृष्ट आणि समान शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने कार्यरत असलेल्या टीच फॉर इंडियाने २०२७ फेलोशिपसाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. दोन वर्षांच्या पूर्णवेळ आणि सशुल्क अध्यापन फेलोशिपच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात अर्थपूर्ण आणि दीर्घकालीन परिवर्तन घडवून आणण्याची संधी युवकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. टीच फॉर इंडियाच्या यंदाच्या फेलोशिप मोहिमेच्या केंद्रस्थानी ‘काहीतरी मोठे’ घडवण्याची संकल्पना आहे. केवळ अध्यापनापुरती मर्यादित न राहता देशातील शैक्षणिक असमानता समजून घेणे, त्यावर उपाय शोधणे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यात सकारात्मक बदल घडवणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. दरवर्षी देशभरातील ५०० हून अधिक महाविद्यालये आणि ३०० हून अधिक कंपन्यांमधून येणाऱ्या विविध क्षेत्रांतील प्रतिभावान उमेदवारांपैकी सुमारे ६०० उमेदवारांची या फेलोशिपसाठी निवड केली जाते. भारतातील प्रतिभावान आणि आशादायी युवकांची ओळख करून त्यांना शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनाच्या चळवळीशी जोडण्यासाठी निवड प्रक्रिया शिस्तबद्ध आणि विचारपूर्वक आखण्यात आली आहे. निवड झालेल्या फेलोंना कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे आणि सर्वसमावेशक शिक्षण देता यावे, यासाठी तज्ज्ञांकडून व्यापक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जाते. त्यानंतर त्यांची देशातील नऊ शहरांपैकी एका शहरातील शाळेत नियुक्ती केली जाते. येथे फेलो विद्यार्थ्यांना शिकवण्यासोबतच त्यांना मार्गदर्शन करतात आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांना स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी आवश्यक कौशल्ये, ज्ञान आणि आत्मविश्वास मिळवून देण्यावर विशेष भर दिला जातो. फेलोशिपच्या दोन वर्षांच्या कालावधीत फेलोंना देशातील शिक्षण व्यवस्थेसमोरील गंभीर असमानता जवळून समजून घेण्याची संधी मिळते. विद्यार्थी, विविध भागीदार आणि शिक्षण क्षेत्रातील प्रमुख घटकांसोबत प्रत्यक्ष काम करत या समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्याचा अनुभवही त्यांना मिळतो. सध्या टीच फॉर इंडियाचे एक हजारांहून अधिक फेलो देशातील नऊ शहरांमध्ये ३२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गांमध्ये शिक्षण देत आहेत. त्याचबरोबर संस्थेच्या पाच हजारांहून अधिक माजी विद्यार्थ्यांनी १६० पेक्षा अधिक सामाजिक प्रभाव निर्माण करणाऱ्या संस्थांची स्थापना किंवा सह-स्थापना केली आहे.

## मास-मार्केट स्कूटरच्या लॉन्चची पुष्टी

**पुणे : दैनिक संध्या**

एथर एनर्जीचे सीईओ आणि सहसंस्थापक तरुण मेहता यांनी पुष्टी केली आहे की कंपनीचा पहिला मास-मार्केट इलेक्ट्रिक स्कूटर, जो नवीन ईएल प्लॅटफॉर्मवर आधारित आहे, तो 29 ऑगस्ट रोजी बेंगळुरूमध्ये होणाऱ्या एथर कम्युनिटी डे मध्ये लॉन्च होणार आहे. एक्स वर ही घोषणा शेअर करताना मेहता यांनी सांगितले की नवीन स्कूटर म्हणजे उत्तम इलेक्ट्रिक स्कूटरची ओळख ठरवणाऱ्या कोर टेक्नॉलॉजी आणि आर्किटेक्चरमध्ये अनेक वर्षांच्या गुंतवणुकीचा परिपाक आहे. “आम्ही अनेक वर्षांपासून चांगल्या स्कूटरसाठी आवश्यक असलेल्या बिल्डिंग ब्लॉक्समध्ये संयमाने गुंतवणूक करत आलो आहोत,” मेहता यांनी लिहिले. “दहा वर्षांनंतर ईव्ही टू-व्हीलर्स आता अर्ली अडॉप्टर स्टेजच्या पुढे जाण्यास तयार आहेत. टेक्नॉलॉजी सर्वांसाठी तयार आहे, फीचर्स सर्वांसाठी महत्त्वाचे होत आहेत. आता फक्त अर्ली अडॉप्टर्ससाठी नाही, तर खऱ्या अर्थाने मेनस्ट्रीमसाठी.”मेहता यांच्या मते, हा बदल इलेक्ट्रिक टू-व्हीलर इंडस्ट्रीसाठी एक नवीन टप्पा आहे, जिथे ईव्ही ला मेनस्ट्रीम ग्राहकांसाठी महत्त्वाच्या असलेल्या प्रत्येक बाबतीत उत्तम कामगिरी करावी लागेल. त्यांनी ग्राहकांच्या अपेक्षांचा उल्लेख केला मजबूत रीसेल व्हॅल्यू, जलद सर्व्हिसिंग, कठीण रस्त्यांवर रायडिंग कम्फर्ट, सहज चार्जिंग अनुभव, स्पष्ट दिसणारी सेफ्टी फीचर्स आणि रोजच्या वापराला अधिक स्मार्ट बनवणारे सॉफ्टवेअर-ड्रिव्हन इंटेलिजन्स. आगामी स्कूटर हा एथर च्या ईएल प्लॅटफॉर्मवर आधारित पहिला प्रॉडक्शन मॉडेल असेल. हा प्लॅटफॉर्म कंपनीच्या नेक्स्ट-जनरेशन स्कूटर आर्किटेक्चरचा भाग आहे, जो एथर कम्युनिटी डे 2025 मध्ये सादर करण्यात आला होता. नवीन प्रॉडक्ट फॅमिली तयार करण्यासाठी डिझाइन केलेला हा प्लॅटफॉर्म एथर च्या इनोव्हेशन आणि ग्रोथच्या पुढील टप्प्याचे प्रतीक आहे, ज्याद्वारे कंपनी इलेक्ट्रिक स्कूटर मार्केटमधील अधिक ॲक्सेसिबल सेगमेंटमध्ये विस्तार करत आहे. या लॉन्चमुळे एथर साठी एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार आहे, कारण कंपनी 450 आणि रिझ्टा रेंजच्या पुढे जाऊन आपले पोर्टफोलिओ वाढवत आहे आणि भारतातील ईव्ही अडॉप्शनच्या पुढील लाटेसाठी स्वतःला तयार करत आहे.

## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास मुदतवाढ

**पुणे : दैनिक संध्या**

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत भारत निवडणूक आयोगाकडे मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली असता आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडून गृहभेटींचा कालावधी ३० जून ते १७ ऑगस्ट असा राहणार आहे. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचनेचे कामही १७ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. मतदार याद्यांचा प्रारूप मसुदा २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार असून, त्यावरील सुनावणी व निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर या कालावधीत पूर्ण केली जाईल. अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदार याद्यांमधील काही मतदारांच्या पत्त्यांची माहिती अपुरी किंवा संक्षिप्त स्वरूपात नोंदविण्यात आलेली होती.उदाहरणार्थ, एखाद्या मतदाराचा पत्ता केवळ "अमुक व्यक्ती, कोथरूड, पुणे" एवढाच नमूद असल्यास संबंधित मतदाराचा शोध घेणे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसाठी (बीएलओ) वेळखाऊ आणि आव्हानात्मक ठरते. त्यामुळे अशा मतदारांनी स्वतःहून आपल्या क्षेत्रातील बीएलओ यांच्याशी संपर्क साधल्यास नोंदणी अर्ज वाटप व पडताळणीची प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. नागरिकांना त्यांच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांक जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या अधिकृत संकेतस्थळावरील माहितीचा उपयोग करता येईल. संबंधित माहिती pune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असेही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी नमूद केले आहे.

## गुरु-शिष्य परंपरेमुळे भारतीय संस्कृतीची जपणूक : व्याख्याते नागेश पाटील

**पुणे : दैनिक संध्या**

भारतीय संस्कृतीची जडणघडण आपल्या पूर्वजांनी, महापुरुषांनी आणि संतांनी केली. तर ही संस्कृती पिढ्यान्‌पिढ्या आपल्यापर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य गुरु-शिष्य परंपरेने केले. भारत हा महान देश आणि महापुरुषांचा देश आहे. हे महापुरुष, संत आणि पराक्रमी राजे कसे घडले, हा प्रश्न इतिहासाला विचारला तर त्याचे एकच उत्तर मिळते, ते म्हणजे गुरु-शिष्य परंपरा, असे प्रतिपादन व्याख्याते नागेश पाटील यांनी केले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित स्व. तानाजी बाबर व्याख्यानमालेत ते बोलत होते.

# वारकरी संप्रदायामध्ये शब्दाच्या सेवेला आणि शब्दसाधनेला महत्त्व

**ज्ञानेश्वरी कंठभूषण ह.भ.प.ओंकार महाराज दुडे शास्त्री यांचे कीर्तन**

■ पुणे (दै. संध्या)




वारकरी संप्रदायामध्ये शब्दाच्या सेवेला आणि शब्दसाधनेला खूप महत्त्व आहे. साधकाच्या जीवनामध्ये परमेश्वराला जेवढे महत्त्व नसते, तेवढे शब्दाला महत्त्व असते. नव्हे तर साधकाच्या जीवनामध्ये शब्द हाच परमेश्वर असतो. जगामध्ये अनेक ग्रंथ आहेत, अनेक पुस्तके आहेत. पण प्रत्येक ग्रंथ हा पूजेसाठी वापरला जात नाही किंवा प्रत्येक ग्रंथ उपासनेसाठी वापरला जात नाही, पण वारकरी संतांनी निर्माण केलेले वाङ्मय हे अभ्यासाचे आणि उपासनेचे सुद्धा आहे, असे प्रतिपादन आळंदी येथील ज्ञानेश्वरी कंठभूषण ह.भ.प.ओंकार महाराज दुडे शास्त्री यांनी केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जंगली महाराज रस्त्याजवळील हॉटेल सेंट्रल पार्क येथे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ९ ऑगस्ट पर्यंत हा महोत्सव सुरु असून दररोज सायंकाळी ५.३० वाजता महाराष्ट्राच्या विविध भागांतील नामवंत कीर्तनकारांना ऐकण्याची व यामाध्यमातून स्वरब्रह्माची अनुभूती घेण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. ओंकार महाराज दुडे शास्त्री म्हणाले, ज्ञानेश्वरी जसा उपासनेचा ग्रंथ आहे, तशी ज्ञानेश्वरी हा अभ्यासाचा ग्रंथ आहे. गाथा जसा उपासनेचा ग्रंथ आहे, तसा गाथा अभ्यासाचा विषय, अभ्यासाचा ग्रंथ आहे. म्हणजे वारकरी संतांनी लिहिलेल्या वाङ्मयाचं विशेषत्व आहे की ते उपासनेमध्येही मोडते आणि अभ्यासामध्येही मोडते.

कीर्तनात पुढे ते म्हणाले. ज्ञानेश्वरी वाचत रहा. वाचत जरी राहिले, काही भावना जरी तयार नाही झाली तरी देखील ती ज्ञानेश्वरी जर तुम्ही वाचत राहिला, तर तुम्हाला कळीकाळाचे भय राहणार नाही. ज्ञानेश्वरी वाचत असताना आपल्या मनामध्ये कोणत्याही प्रकारचा संशय आपण शिल्लक नाही ठेवायचा.

सर्वतः ज्ञानेश्वरीवरती अवलंबून, ज्ञानेश्वरीलाच आपला आधार मानून, आपलं संपूर्ण जीवन ज्ञानेश्वरीला अर्पण करून, मनामधले सगळे संशय बाजूला सोडून, ही ज्ञानेश्वरी माझा उद्धार करणार आहे, ही ज्ञानेश्वरी मला भगवंतापर्यंत नेणारी आहे, असा दृढ भाव मनामध्ये धारण करून ती वाचायची, असे संत एकनाथ महाराज सांगतात, असेही त्यांनी सांगितले. महोत्सवाला प्रवेश खुला असून कीर्तनांचा पुणेकरांनी आनंद घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## ‘राम कृष्ण हरी’च्या गजरात ‘दगडूशेठ’ चातुर्मास कीर्तन महोत्सवाचा शुभारंभ

■ पुणे (दै. संध्या)

टाळ मृदुंगाचा गजर, मंत्रमुग्ध करणारे अभंग, ज्ञानोबा तुकोबांचे जीवन विषयक तत्त्वज्ञान सांगणारे कीर्तनकारांची अमोघ वाणी आणि जय जय राम कृष्ण हरी चा गजर अशा पवित्र आणि भक्तिमय वातावरणात 'दगडूशेठ' चातुर्मास कीर्तन महोत्सवाचा शुभारंभ झाला. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी नाशिक येथील वारकरी भूषण श्रीगुरु ह.भ.प.चैतन्य महाराज निंबोळे यांचे कीर्तन झाले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सेंट्रल पार्क येथे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी ट्रस्टचे व मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. समाजभूषण शांताराम महाराज निमन, अरुण पवार, उद्धव गोळे, वैभव महाराज साखरे, जयवंत चांदेरे, राधाकृष्ण गुरुजी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

चैतन्य महाराज निंबोळे म्हणाले, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचा चातुर्मासानिमित्त दरवर्षी आयोजित करण्यात येणारा कीर्तन महोत्सव हा सर्वांसाठी एक सांस्कृतिक पर्वणी आहे. या महोत्सवामध्ये आल्यानंतर ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांची निश्चितच




■ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजन

आठवण येते, त्यांची परंपरा पुढे सुरू ठेवण्याची संधी प्रश्न मला दिली याबद्दल मी स्वतःला भाग्यवान मानतो. प्रास्ताविकात महेश सूर्यवंशी म्हणाले, नुकतीच आषाढी वारी झाली आणि प्रथेप्रमाणे श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट तर्फे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यंदा या महोत्सवाचे ४० वे वर्ष आहे . वारकरी संप्रदायाची सेवा करण्याची ही आम्हाला एक संधी आहे. आपल्या संतांनी दिलेली शिकवण पुढील पिढीपर्यंत पोहोचावी आणि त्याचे अनुकरण समाजामध्ये व्हावे या उदात्त हेतूने हा महोत्सव दरवर्षी आयोजित करण्यात येतो.

## न्यायप्रक्रियेस मदत करणाऱ्या तज्ज्ञांचा रुद्रगर्जना वाद्यपथकातर्फे सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

नसरापूर बालिका अत्याचार व हत्या प्रकरणाच्या तपासात आणि न्यायप्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या अधिकारी व तज्ज्ञांचा रुद्रगर्जना वाद्य पथकातर्फे सत्कार करण्यात आला. रुद्रगर्जना वाद्यपथकाच्या वाद्यपूजनाचा आणि सरावाचा शुभारंभ सिंहगड महाविद्यालय मैदानासमोरील रुद्रगर्जना वाद्यपथकाच्या सरावस्थळी करण्यात आला. कार्यक्रमाला श्री कसबा गणपती मंडळ तसेच हुतात्मा बाबू गेनू मंडळाचे पदाधिकारी, श्री महालक्ष्मी मंदिर सारसबाग विश्वस्त ज्येष्ठ विधिज्ञ प्रताप परदेशी, थायलंड येथील श्री दगडूशेठ गणपती मंदिराचे विश्वस्त चेतन लोढा, अकरा मारुती मंडळाचे विनायक घाटे, उद्योजक हेमंत दांगट आदी उपस्थित होते. पथकाचे संस्थापक शैलेश निंगुणे, अध्यक्ष राहुल नायर आणि कार्याध्यक्ष तुषार मानकर यांच्या हस्ते हा सत्कार झाला. यंदा पथकाचे १४वे वर्ष आहे. पुण्यात पहिल्यांदाच अशा प्रकारचा उपक्रम आयोजित करून सामाजिक भान ठेवून उतम आयोजित करण्यात आला. यावेळी वादकांना कायद्याच्या चौकटीत राहून सर्व नियमांचे पालन करण्याचे, नियमित सराव करण्याचे तसेच व्यसनमुक्त राहून गणरायाची सेवा करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

## इम्पॅक्ट मिंट्सने रणवीर सिंह यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून केली निवड

■ पुणे (दै. संध्या)

जर्मनीतील अग्रगण्य मिंट ब्रँड इम्पॅक्ट मिंट्स® ने आज रणवीर सिंह यांची भारतातील पहिली राष्ट्रीय ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषणा केली आहे. हा निर्णय इम्पॅक्ट मिंट्स च्या प्रवासातील एक निर्णायक क्षण ठरला आहे, ज्यामुळे आज हा ब्रँड भारतातील सर्वाधिक पसंतीचा मिंट ब्रँड बनला आहे. ‘अल्टिमेट शोमॅन’ आणि जनरेशनल परफॉर्मर म्हणून ओळखले जाणारे रणवीर सिंह यांचा उत्साही स्वभाव आणि व्यापक लोकप्रियता त्यांना ब्रँडसाठी नैसर्गिक निवड बनवते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ब्रँडचा बोल्ड, युथफुल स्पिरिट आणि दररोज ग्राहकांना फ्रेश व आत्मविश्वासपूर्ण वाटण्यासाठी असलेली बांधिलकी प्रतिबिंबित होते.




इम्पॅक्ट मिंट्स चे उद्दिष्ट राष्ट्रीय स्तरावर ब्रँड व्हिजिबिलिटी अधिक वेगाने वाढवणे आणि रिटेल उपस्थिती मजबूत करून सातत्यपूर्ण विक्री वाढीस पाठबळ देणे आहे. ही भागीदारी ब्रँडच्या व्हिजनला अधोरेखित करते—भारतीयांसाठी फ्रेशनस रोजची सवय बनवणे आणि आत्मविश्वास व सोयीचा संगम जिथे होतो तिथे ग्राहकांचा पहिला पर्याय ठरणे. ‘फ्रेशनस इज फॉर एव्हरीवन’ ही कल्पना साकार करत रणवीर सिंह यांचा समावेश असलेला कॅम्पेन दाखवतो की इम्पॅक्ट मिंट्स रोजच्या ‘मोमिंट्स’ साठी सोयीस्कर साथीदार आहे शूटसाठी जाताना, मित्रांना भेटताना किंवा प्रवास करताना. ‘कॉन्फिडन्स फ्रेशनसपासून सुरू होते’ या इनसाइटवर आधारित हा कॅम्पेन इम्पॅक्ट मिंट्स ला प्रीमियम, सहज वाहून नेता येणारे उत्पादन म्हणून पोझिशन करतो, जे प्रत्येक लाइफस्टाइलमध्ये सहज मिसळते. पुढे जाताना इम्पॅक्ट मिंट्स चे उद्दिष्ट भारतभर विस्तार करत राहणे आहे नवीन आणि रोमांचक फ्लेवर इनोव्हेशन्स सादर करणे, लिमिटेड एडिशन कलेक्टिबल्स आणणे आणि देशभरात वितरण नेटवर्क अधिक मजबूत करणे.

## सिग्निफायने फिलिप्स फोकसग्लो रेंज केली सादर

डोळ्यांच्या आरामासाठी तयार केलेले लाईटिंग, खऱ्या रंगांवर कोणतीही तडजोड नाही

■ पुणे (दै. संध्या)

सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट), जगातील अग्रगण्य लाईटिंग कंपनीने आज फिलिप्स फोकसग्लो रेंज लाँच केली – एक अशी लाईटिंग सोल्यूशन जी लोक वाचन, अभ्यास आणि कृत्रिम प्रकाशाखाली काम करताना घालवलेल्या तासांसाठी खास तयार केली आहे. फोकसग्लो उच्च रंग अचूकता आणि कमी फ्लिकर परफॉर्मन्स एकत्र आणते, ज्यामुळे रोजच्या जागांना अधिक आरामदायी आणि विश्वासार्ह प्रकाश मिळतो.

जसे अधिकाधिक ग्राहक घरात वाचन, अभ्यास किंवा कृत्रिम प्रकाशाखाली काम करताना जास्त वेळ घालवत आहेत, तसे डोळ्यांचा ताण कमी करणारे आणि तरीही ब्राइटनेस व रंग गुणवत्ता कायम ठेवणारे लाईटिंगची मागणी सतत वाढत आहे. फिलिप्स फोकसग्लो रेंज ही गरज पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे,




जी आरामदायी, रोजच्या वापरासाठी विश्वासार्ह प्रकाश देणारे घरगुती सोल्यूशन आहे. लाँचबद्दल प्रतिक्रिया देताना, सी. अरुण कुमार, हेड ऑफ कन्झ्युमर बिझनेस, सिग्निफाय ग्रेटर इंडिया म्हणाले, “सिग्निफायमध्ये आम्ही प्रत्येक उत्पादन लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात प्रकाश कसा अनुभवतात यावर आधारित डिझाइन करतो. फिलिप्स फोकसग्लोसोबत आम्ही अचूक रंग रेंडरिंग आणि अर्थपूर्ण डोळ्यांचा आराम एकत्र आणत आहोत, ज्यामुळे एखादी व्यक्ती वाचत असो, अभ्यास करत असो किंवा डेस्कवर काम करत असो – त्यांच्या आजूबाजूचा प्रकाश डोळ्यांना साथ देतो, ताण देत नाही.”

फोकसग्लोचा सीआरआय >90 (रंग प्रस्तुतीकरण निर्देशांक) रंग नैसर्गिक दिसण्यास मदत करतो आणि डोळ्यांवरील ताण कमी करतो – वाचन, अभ्यास आणि जवळून केलेल्या कामांसाठी हा खरा फायदा आहे, जिथे डोळ्यांचा आराम खरोखर महत्त्वाचा ठरतो.

हा लॅम्प सिग्निफायच्या आयकम्फर्ट टेक्नॉलॉजी वर चालतो, जी दीर्घकाळ वापरात फ्लिकर कमी करण्यासाठी खास डिझाइन केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी, प्रोफेशनल्ससाठी आणि घरांसाठी हा एक उपयुक्त पर्याय ठरतो, जे दीर्घकाळ जवळून काम करताना व्हिज्युअल थकवा कमी करू इच्छितात.

## धर्मांतरविरोधी कायदा : ‘हिंदू समाजा’च्या दोन दशकांच्या संघर्षाला ऐतिहासिक यश!

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ (धर्मांतरविरोधी कायदा) या ऐतिहासिक विधेयकाला सन्माननीय राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्याबद्दल हिंदू जनजागृती समिती आणि सर्व समविचारी हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने राज्य सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन! छुप्या प्रेमातून होणाऱ्या धर्मांतराचे गंभीर संकट ओळखून सन २००६ मध्ये हिंदू जनजागृती समितीने 'लव्ह जिहाद' या विषयावर देशातील पहिलेवहिले पुस्तक प्रकाशित करून महाराष्ट्रात या संदर्भातील कायद्याची सर्वात पहिली अधिकृत मागणी लावून धरली होती. पुढे ११ भाषांमध्ये हे पुस्तक प्रकाशित झाले. हा विषय त्या वेळी कोणी बोलत नव्हते तेव्हा हा विषय समितीने आयोजित केलेल्या ‘हिंदु राष्ट्र-जागृती सभा’ आणि ‘वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सव’ या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून या कायद्याची आवश्यकता अत्यंत अभ्यासपूर्ण रीतीने देशभर रुजवली. त्यानंतर कृतीच्या स्तरावर प्रयत्न सुरू झाले. गेल्या दोन दशकांत रक्षाबंधन, गणेशोत्सव



व नवरात्र या उत्सवांमधील जनजागृती मोहिमा, शेकडो आमदारांना दिलेली निवेदने आणि मुख्य म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात काढण्यात आलेले प्रचंड हिंदू मोर्चे व आंदोलने यांमुळे या कायद्यासाठी जनभावनेचा अभूतपूर्व उद्रेक निर्माण झाला. सर्व हिंदुत्वनिष्ठ संघटनांचा हा अखंड संघर्ष आणि जनभावना यांची योग्य दखल घेऊन सरकारने हा कठोर कायदा अमलात आणल्याबद्दल आम्ही सरकारचे आभार मानतो. आता या कायद्याची राज्यात अत्यंत प्रभावी आणि कठोर अंमलबजावणी व्हावी, हीच आमची अपेक्षा आहे.

## नऊ महिन्याच्या बालकाच्या तोंडात फेव्हिक्विक ओतण्याची संतापजनक घटना

■ पुणे (दै. संध्या)

कौटुंबिक वादातून भावजयीने अवघ्या नऊ महिन्यांच्या निष्पाप बालकाच्या तोंडात फेव्हिक्विक ओतल्याची धक्कादायक आणि चीड आणणारी घटना लोहगाव येथील कलवड वस्तीत उघडकीस आली आहे. फेव्हिक्विकमुळे बालकाच्या तोंडात गंभीर अंतर्गत जखमा झाल्या असून, त्याच्यावर ससून रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी अल्ताफ नबी शेख (वय ३९, रा. कलवड वस्ती, लोहगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार लोहगाव पोलिस ठाण्यात भावजयीसह तिच्या मुंबईतील दोन नातेवाइकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सानिया शेख (रा. कलवड वस्ती, लोहगाव), रियाज इमाम हल्याळ (वय ४८) आणि हाजी मलंग शेख (दोघे रा. कांदिवली, मुंबई) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्ताफ शेख आणि त्यांचा भाऊ लोहगावमधील कलवड वस्तीत एकत्र राहतात. काही दिवसांपासून किरकोळ कारणावरून कुटुंबात वाद सुरू होते. ३१ जुलै रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास अल्ताफ कामावर गेलेले असताना, भावजय सानिया हिने कौटुंबिक वादातून अल्ताफ यांच्या नऊ महिन्यांच्या मुलाच्या तोंडात फेव्हिक्विक ओतले. बालकाची आई जैनब यांच्या हा प्रकार लक्षात येताच त्यांनी घाबरून पतीला फोनवरून माहिती दिली. बालकाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. जैनब यांनी सानियाला जाब विचारला असता, ‘हा प्रकार कोणाला सांगितल्यास सोडणार नाही,’ अशी धमकी सानियाने दिली.

## दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये संताप

काँग्रेस तालुकाध्यक्ष शंकर नलावडे यांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

■ पुणे (दै. संध्या)

राजगड तालुक्यातील निगडे मोसे गावात गेल्या काही दिवसांपासून नळाद्वारे अत्यंत गढूळ व दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येबाबत राजगड (वेल्हे) तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकर रोहिदास नलावडे यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी (BDO) यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नलावडे यांनी म्हटले आहे की, गावातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून नळाद्वारे गढूळ, दूषित व आरोग्यास अपायकारक पाणी मिळत आहे. हे पाणी पिण्यास अयोग्य असून



त्यामुळे उलट्या, जुलाब (डायरिया) तसेच इतर जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची तातडीने पाहणी करून दूषित पाण्याचा स्रोत शोधावा, आवश्यक दुरुस्ती व स्वच्छतेची कामे त्वरित पूर्ण करावीत तसेच गावकऱ्यांना शुद्ध, स्वच्छ व पिण्यायोग्य पाण्याचा नियमित पुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता तातडीने कारवाई करून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, अन्यथा ग्रामस्थांसह लोकप्रतिनिधींना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही शंकर रोहिदास नलावडे यांनी दिला आहे.

# CJP आंदोलन, Gen Z रस्त्यावर, तरीही भाजपा जोरदार मुसंडी मारेल; अमेरिकी एक्स्पर्टचा मोठा दावा!

■ आदर्की (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाची जगभर चर्चा सुरू आहे. या निमित्ताने नेपाळ, बांगलादेश येथे झालेल्या जेन झी आंदोलनाची अनेकांना आठवण झाली असून, तसा प्रकार भारतातही घडणार का, याकडे जगाचे लक्ष लागले आहे. परंतु, यातच एक अमेरिकन तज्ज्ञाने सीजेपी आंदोलन, जेन झी रस्त्यावर उतरणे याचा भाजपावर काही परिणाम होणार नाही. भाजपा जोरदार वापसी करेल, असा मोठा दावा केला आहे.

दिल्लीच्या जंतर मंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलनाने राष्ट्रीय आणि जागतिक लक्ष वेधून घेतले आहे. साऊथ एशिया इन्स्टिट्यूटचे संचालक मायकल कुगेलमन यांनी आंदोलनाच्या विश्लेषणात हे मान्य केले आहे की, या आंदोलनाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हे आंदोलन राजकीय पक्ष आणि राजकीय विश्लेषकांसाठी एक महत्त्वाचा धडा आहे. तथापि, त्यांनी असेही म्हटले आहे की, भारतातील सरकार या आंदोलनांच्या परिणामांवर मात करेल.

अमेरिकन तज्ज्ञ मायकल कुगेलमन यांच्या मते, भारतातील कॉक्रोच आंदोलन हे या सरकारच्या कार्यकाळात उभे राहिलेले सर्वात मोठे आणि व्यापक आहे, हे नाकारता येणार नाही. राजकारणात कोणतीही गोष्ट हलक्यात घेता येत नाही, ही बाब विसरता येणार नाही. या गोष्टीची झळ सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचलेली दिसत नाही. भारतीय पंतप्रधान खंबीर आहेत आणि ते पुन्हा उभारी घेऊन या कॉक्रोच जनता पार्टीच्या आव्हानातून वाचतील. परंतु, या आंदोलनामुळे ते पूर्वीच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या कमकुवत झाले आहेत, असा दावाही त्यांचा आहे.

केंद्र सरकारच्या कामगिरीचा विचार करता, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारला जाणार नाही यावर बहुतेक तज्ज्ञांचे एकमत होते. २५ जुलै रोजी प्रधान यांनी केलेल्या राजीनाम्याच्या घोषणेने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक तज्ज्ञांना आश्चर्याचा धक्का बसला. काहींनी याकडे भारतातील सरकार कमकुवत होत असल्याचे लक्षण म्हणून पाहिले. मायकल कुगेलमन यांच्यासह अनेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की हा एक धक्का असू शकतो, परंतु सरकार सावरेल. दरम्यान, भारत आणि इतर शेजारी देशांप्रमाणे पाकिस्तानातील तरुण रस्त्यावर का उतरत नाहीत, यावर ते म्हणतात की, पाकिस्तानातील विविध चळवळी एकजूट होण्यात अपयशी ठरत आहेत. सरकारविरोधात अनेक समान तक्रारी असूनही, सामाजिक विभागणी हेच कारण आहे की लोक एकत्र येत नाहीत.



## थोडक्यात पण महत्वाचे

### हिंसाचार नेपाळमध्ये, भारताच्या १०४७ किमी सीमेवर हाय अलर्ट

**नेपाळ : दैनिक संध्या**

पुन्हा एकदा हिंसाचार उफाळल्याचे पाहायला मिळत आहे.नेपाळमधील कोशी प्रांतातील जातीय हिंसाचार आता अत्यंत गंभीर वळणावर पोहोचला आहे. नेपाळमध्ये झालेल्या हिंसक संघर्ष आणि तणावाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशमधील सुरक्षा यंत्रणांना पूर्णपणे सतर्क करण्यात आले आहे. नेपाळमधील अशांततेचा भारतावर कोणताही परिणाम होऊ नये आणि सीमावर्ती भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी भारत-नेपाळ सीमेवर 'हाय अलर्ट' घोषित करण्यात आला आहे. उत्तर प्रदेश आणि नेपाळ दरम्यानची ५७९ किलोमीटर लांबीची खुली आंतरराष्ट्रीय सीमा जोडणाऱ्या तब्बल ७ जिल्ह्यांमधील गावांमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे. यामध्ये पिलिभीत, लखीमपूर खीरी, बहराइच, श्रावस्ती, बलरामपूर, सिद्धार्थनगर आणि महाराजगंज या सीमावर्ती जिल्ह्यांचा समावेश आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन उत्तर प्रदेश पोलीस, सशस्त्र सीमा दल आणि गुप्तचर यंत्रणांनी सीमावर्ती भागांत आपली पकड अधिक मजबूत केली आहे. संवेदनशील चेकपोस्ट आणि जंगलातील मार्गांवर २४ तास पहारा ठेवण्यात आला आहे. सीमेवरून ये-जा करणाऱ्या प्रत्येक प्रवाशांची कसून ओळख पटवली जात असून दुचाकी, चारचाकी वाहनांची व व्यावसायिक वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. सुरक्षा यंत्रणा नेपाळच्या सशस्त्र पोलीस दलाच्या सतत संपर्कात असून गुप्त माहितीची तात्काळ देवाणघेवाण करण्यासाठी समन्वय वाढवण्यात आला आहे. नेपाळमधून येणाऱ्या नागरिकांच्या संख्येत घट झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. तसेच सीमा भागात कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ याची माहिती पोलिसांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नेपाळमधील परिस्थिती आटोक्यात येईपर्यंत सीमेवर हा कडक पहारा अशाच प्रकारे सुरू राहणार आहे.

### अभिनेत्री तृषाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; उदयनिधी स्टॅलिन यांना घेतलं ताब्यात

**तमिळनाडू : दैनिक संध्या**

विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन हे अभिनेत्री तृषाबाबत केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यामुळे मोठ्या वादात सापडले आहेत. एका सार्वजनिक सभेदरम्यान केलेल्या कथित द्विअर्थी वक्तव्यावरून त्यांच्यावर सर्व स्तरांतून टीका होत आहे. याप्रकरणी पोलिसांनी उदयनिधी स्टॅलिन यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना कावेरी नदीच्या पाणीवाटपाच्या प्रश्नावर आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान घडली. या सभेत उदयनिधी स्टॅलिन यांनी तमिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांच्यावर निशाणा साधत राज्याला कावेरीचे योग्य प्रमाणात पाणी मिळत नसल्याचा आरोप केला. भाषणादरम्यान उपस्थित गर्दीने अभिनेत्री तृषाच्या नावाच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यावेळी उदयनिधी यांनी त्या घोषणांबाबत प्रश्न उपस्थित करत कथितरित्या द्विअर्थी टिप्पणी आणि आक्षेपार्ह हावभाव केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सत्ताधारी टीव्हीके पक्षाने या प्रकरणाची तीव्र नोंद घेत उदयनिधी स्टॅलिन यांनी तातडीने माफी मागावी, अशी मागणी केली. टीव्हीकेचे नेते अधव अर्जुन यांनी उदयनिधी यांचे भाषण अश्लील आणि द्विअर्थी असल्याचा आरोप करत, त्यांनी महिलांचा अपमान केला असून राजकारणाची पातळी खालावल्याची टीका केली. तसेच, अशा भाषेमुळे दिवंगत नेते सी. एन. अण्णादुरई यांच्या विचारसरणीची आणि प्रतिष्ठेची हानी होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या वादावर प्रतिक्रिया देताना उदयनिधी स्टॅलिन यांनी, "मी काही चुकीचे बोललो का? मी कोणाचे नाव घेतले का? यावर मला अधिक काही भाष्य करायचे नाही," असे स्पष्टीकरण दिले. मात्र, त्यांच्या या भूमिकेनंतरही राजकीय वातावरण तापले असून विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. दरम्यान, या प्रकरणामुळे तमिळनाडूच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला असून, पुढील कायदेशीर आणि राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नाशिकला ८०० बसेसची गरज; २० वर्षांत खासगी वाहनांचा वापर ६६ टक्क्यांवर

**नाशिक : दैनिक संध्या**

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी तातडीने मोठी गुंतवणूक झाली नाही, तर पुढील दोन दशकांत खासगी वाहनांवरील अवलंबित्व धोकादायक पातळीवर पोहोचणार असल्याचा इशारा महा मेट्रोच्या सर्वसमावेशक गतिशीलता योजनेत (सीएमपी) देण्यात आला आहे. सध्या शहरातील प्रवासात खासगी वाहनांचा वाटा ५३.८ टक्के असून, तो २० वर्षांत ६६.३ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. त्याचवेळी सार्वजनिक वाहतुकीचा वापर १९.४ टक्क्यांवरून केवळ १०.१ टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. शहरात सध्या जवळपास १९ लाख वाहने असून, दरवर्षी सुमारे ९० हजार नवीन वाहनांची भर पडत आहे. ही वाढ कायम राहिल्यास वाहतूककोंडी, पार्किंगचा ताण, वायू प्रदूषण आणि अपघातांचे प्रमाण अधिक वाढण्याची भीती व्यक्त केली आहे. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हार्डिकर यांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. शहर बससेवा सक्षम करणे आणि प्रस्तावित मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीमची अंमलबजावणी केल्यास खासगी वाहनांचा वाढता वापर रोखता येईल, असे त्यांनी सांगितले. सध्या दैनंदिन प्रवासात दुचाकींचा वाटा ४५.५ टक्के, ऑटोरिक्षांचा २६.८ टक्के, सार्वजनिक वाहतुकीचा १९.४ टक्के आणि खासगी कारचा ८.३ टक्के आहे. पुढील २० वर्षांत दुचाकींचा वाटा ५०.४ टक्के, तर कारचा वाटा जवळपास दुप्पट होऊन १५.९ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शाश्वत आणि पर्यावरणपूरक शहरासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार हाच प्रभावी पर्याय असल्याचे सीएमपीमध्ये नमुद केले आहे. सीएमपीमध्ये शहरातील तीन प्रमुख मार्गांवर मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम उभारण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही व्यवस्था शहर बससेवेशी जोडल्यास वेगवान, सुरक्षित आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक उपलब्ध होईल. त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचण्याबरोबरच वाहतूक कोंडी, इंधनाचा वापर आणि प्रदूषणातही मोठी घट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. भविष्यातील वाहतूक व्यवस्थेचा कणा म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.

### नाशिक जिल्ह्यातील ४ तालुक्यात भूकंपाचे धक्के

**नाशिक: दैनिक संध्या**

नाशिक जिल्ह्यात काल सुरगाणा तालुक्यात भूकंपाचे धक्के बसले होते. त्या पाठोपाठ मध्यरात्री चार तालुक्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत, त्यामुळे नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरगाणा तालुक्यात बोरगाव परिसरात रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी भूकंपाचा धक्का जाणवला तसेच सराड, चिखली, बोरगाव येथे पुन्हा रात्री २ वाजून ४५ मिनिटांनी वाजता भूकंपाचे धक्के बसले त्यामुळे सराड येथील शासकीय आश्रम शाळेच्या भिंतीला तडे गेले आहेत. कळवण तालुक्यातील दळवट येथे ११:५६ वाजता सौम्य धक्के जाणवले. दिंडोरी तालुक्यातील ननाशी बाडगीचा पाडा येथे रात्री ११:५५ वाजता भूकंपाचा सौम्य धक्का बसला तर पेठ तालुक्यातील शिवशेत परिसरात रात्री २ वाजून ४४ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी किंवा वित्त हानी झाली नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

## बालविकास, महिला सक्षमीकरणात प्रत्येकाचे योगदान गरजेचे

अमृता देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; ग्रॅव्हिट्स फाउंडेशनतर्फे ऊर्जा पुरस्कारांचे वितरण

■ पुणे (दै. संध्या)



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, आहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांसारख्या महिलांनी आपल्या कतृर्त्वाने देशासाठी मोठे योगदान दिले. आजच्या काळातही असे काम करणाऱ्या महिलांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. बालविकास व महिला सक्षमीकरणासाठी केवळ प्रशासन पुरेसे नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन योगदान द्यायला हवे. प्रत्येकाने आपापल्या क्षमतेनुसार महिला, लहान मुले, पर्यावरण, सामाजिक क्षेत्रात काही ना काही चांगले काम करायला हवे, असे प्रतिपादन दिव्यज फाऊंडेशनच्या संस्थापिका अमृता देवेंद्र फडणवीस यांनी केले. ग्रॅव्हिट्स फाऊंडेशन आयोजित ऊर्जा पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मॅरियट येथे आयोजित कार्यक्रमावेळी ग्रॅव्हिट्स फाऊंडेशनच्या संस्थापिका उषा काकडे, डॉ. शां. ब मुजुमदार, सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, लोकमंगल फाऊंडेशनचे विश्वस्त रोहन देशमुख, प्रसिद्ध क्रिकेटपटू तिलक वर्मा, प्रसिद्ध अभिनेते चंकी पांडे, तेलगु चित्रपटसृष्टीतील दिग्दर्शक व्यंकटेश (व्यंकी) कुडुमुला आदी उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांना यंदाचा 'उर्जा जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संजय गुप्ते (विशेष आरोग्यसेवा), कायनेटिक ग्रीन एनर्जीच्या संस्थापिका सुलज्जा फिरोदिया मोटवानी (उद्योजकता), भारतीय क्रिकेटपटू तिलक वर्मा (क्रीडा), लोकसाहित्य आणि सत्यशोधक चळवळीचे व्यासंगी अभ्यासक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे (साहित्यसेवा), सोलापूर येथील जिव्हाळा मतिमंद संस्थेचे प्रमुख अण्णाराव भिमशंकर राजमाने (शिक्षण व समाजसेवा) यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. याबरोबरच उरी हल्ल्यातील शहीद जवान अर्जुन जाधव यांच्या स्मरणार्थ वीरपत्नी सायली अर्जुन जाधव व त्यांच्या आई वडीलांनाही शौर्य पुरस्काराने विशेष सन्मानित करण्यात आले. माळशिरस दुर्घटनेतील पाच जणांचा जीव वाचवणाऱ्या तांदुळवाडी येथील इरफान मुजावर यांना मानवतावादी पुरस्कार दिला. सन्मानचिन्ह, शाल, तुळशीचे रोप असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

## पंतप्रधानांवर टीका करणाऱ्या 'त्या' मुलीचा पत्ता लीक

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

जंतरमंतर येथे कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान पंतप्रधानांवर वादग्रस्त आणि आक्षेपार्ह विधान करणे एका १० वीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीला महागात पडले आहे. मुलीने या सगळ्या प्रकारानंतर सार्वजनिकरीत्या माफी मागितली असली, तरी पोलिसांचा ससेमिरा आणि लोकांकडून टीका सुरूच आहे. पोलिसांनी तिच्यावरील एफआयआर रद्द केला असला, तरी तिला मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. एफआयआरमधील तिचा पत्ता लीक झाल्यामुळे आणि सोशल मीडियावर सतत मिळत असलेल्या धमक्यांमुळे त्या कुटुंबाला आतापर्यंत तब्बल तीन वेळा आपली राहण्याची जागा बदलत घर बदलावे लागले आहे. त्या मुलीचे वकील अनिल कुमार यांनी सांगितले की, एफआयआर नोंदवली गेल्यानंतर मुलीचा पत्ता सार्वजनिक झाल्यामुळे अनेक अज्ञात लोक, राजकीय पार्श्वभूमी असलेले व्यक्ती आणि समाजकंटक त्यांच्या नोएडा येथील घरी धडकले. थेट जीवे मारण्याची धमकी दिल्ली जात आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव आधी त्यांना फरिदाबादमधील एका नातेवाईकाच्या घरी आश्रय घ्यावा लागला, परंतु तिथेही धमक्या येणे बंद न झाल्यामुळे त्यांना पुन्हा एकदा अज्ञात ठिकाणी जावे लागले आहे. वकिलांनी स्पष्ट केले की, सोशल मीडियावर फिरणारे दावे चुकीचे असून ही मुलगी २५ वर्षांची नसून ती फक्त १५ वर्षांची अल्पवयीन मुलगी आहे. दिल्लीतून ओपन स्कूलिंगद्वारे १० वीच्या वर्गात शिकत आहे. तिची आई सिंगल मदर असून त्या खासगी शिकवणी घेऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. या संपूर्ण प्रकरणामुळे या मुलीवर, तिच्या कुटुंबियांवर प्रचंड मानसिक ताण आला आहे. दरम्यान, या मुलीने एका व्हिडिओद्वारे आपली चूक मान्य करत देशाची माफी मागितली. माफी मागीतल्यानंतरही त्यांचा त्रास कमी झालेला नाही. या प्रकरणात मुलीच्या वयाबाबतही मोठा गोंधळ समोर आला आहे.




## भाजपा मुख्यमंत्र्यांविरोधात CBI सुप्रीम कोर्टात

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अरुणाचल प्रदेशचे मुख्य सचिव आणि गृह सचिवांना उत्तर देण्यासाठी कोर्टात बोलावलं आहे. सीबीआयने मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्याविरोधातील तपासात राज्य सरकार सहकार्य करत नाही असा आरोप लावला होता. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने हे पाऊल उचलले आहे. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने सीबीआय स्टेटस रिपोर्ट पाहिला. एप्रिल महिन्यात कोर्टाने दिलेल्या आदेशानंतर सीबीआयने कारवाई सुरू केली होती. ज्यामध्ये खांडू यांच्याशी संबंधित सार्वजनिक बांधकाम कंत्राटांच्या वाटपात झालेल्या पक्षपाताच्या आरोपांची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

रिपोर्टची पडताळणी केल्यानंतर खंडपीठाने नमूद केले की, केंद्रीय तपास यंत्रणेने राज्य सरकारकडून कागदपत्रे मिळवण्यात येणाऱ्या अडचणी निदर्शनास आणल्या होत्या. सीबीआयने १७ जुलै रोजी एक स्टेटस रिपोर्ट सादर केला आहे. राज्य सरकार कागदपत्रे पुरवण्यात सहकार्य करत नाही असं त्या अहवालातून दिसून येते. त्यामुळे मुख्य सचिव आणि प्रधान सचिव (गृह) यांना नोटीस बजावणे खंडपीठाला योग्य वाटते. या वरिष्ठ अधिकाऱ्यांना २४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीच्या दिवशी व्यक्तिशः हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.

खंडपीठाने या दोन अधिकाऱ्यांना सीबीआय अहवालावर त्यांचे उत्तर घेऊन न्यायालयात हजर राहण्याचे आणि कोर्टाच्या निर्देशांचे पालन का केले नाही व ते सहकार्य का करत नाहीत याचे स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले. एप्रिलमध्ये सुप्रीम कोर्टाने २०१५-२०२५ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पेमा खांडू आणि त्यांच्या नातेवाईकांशी संबंधित कंपन्यांना सार्वजनिक कामांची कंत्राटे दिले होते. या कंत्राटातील पक्षपाताच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देश कोर्टाने सीबीआयला दिले होते. प्राथमिक चौकशी आणि त्यानंतरच्या तपासात १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील सार्वजनिक कामांच्या कंत्राटांची आणि कार्यादेशांची अंमलबजावणी समाविष्ट असेल. केंद्रीय तपास यंत्रणेला या कालावधीबाहेरील व्यवहारांची चौकशी करण्यापासून रोखले जाणार नाही असं खंडपीठाने स्पष्ट केले होते. दरम्यान, खंडपीठाने राज्य सरकारला तपासात पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. अरुणाचल प्रदेश सीबीआयला पूर्ण सहकार्य करेल. मुख्य सचिव सीबीआयसोबत समन्वय साधण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करतील. कोणतीही कागदपत्रे नष्ट होणार नाहीत याची राज्य सरकार खात्री करेल असा आदेश खंडपीठाने दिला आहे. तपास यंत्रणेला न्यायालयासमोर सद्यस्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महानिर्मिती — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/१८

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००७०८१० / बीएम | संच क्र. ३,४,५ बॉयलरमध्ये ० मीटर ते ५२ मीटर पातळीपर्यंत बॉयलर सपोर्ट स्ट्रक्चर्स, फॅन सपोर्ट स्ट्रक्चर्स आणि डक्ट सपोर्ट स्ट्रक्चर्सचे रंगकाम करण्याचे काम. | ८,२८,३८८/- / ११,७९०/- |
| २. | ३००००७०६८७ / ईएम | संच ४ COH दरम्यान UAT कुलिंग फॅन आणि कंट्रोल पॅनलचा पुरवठा स्थापना आणि कार्यान्वयन. | २०,५९,६५०/- / २४,१००/- |
| ३. | ३००००७०९८६ / सीएचपी | सीएचपी २ आणि ३ मधील वॅगन टिपलर आणि संबंधित सहाय्यकांच्या सर्व्हिसिंगसाठी वार्षिक कामाचा करार. | १,२२,८३,७१९/- / १,२६,३४०/- |
| ४. | ३००००७०७१० / सीएचपी | विविध कन्व्हेयर्सच्या बोगद्यात स्लरी पंपचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वित करणे. | १९,८६,६००/- / २३,४००/- |
| ५. | ३००००६६४८९ / डब्ल्युटीपी | एनटीपीएस मध्ये निर्माण होणा-या हजारडस् वेस्टची विल्हेवाट लावणे. | २०,५६,०५६/- / २४,१००/- |
| ६. | ३००००७०९३१ / टीएम | संच क्र. ४ च्या सीओएच दरम्यान एमएसईआरडब्लु पाईप्सचे फॅब्रिकेशन, उभारणी, बदल करण्यासाठी कामाचा करार. | ७,२९,९२१/- / १०,८००/- |
| ७. | ३००००७०९७६ / बीएम | संच क्र. ३,४,५ ला वर्कशॉप क्लिनींग आणि बॉयलर ऑक्झीलरीज चे लुब्रीकेशनसाठी वार्षिक कंत्राट. | १६,९७,३५५/- / २०,४८०/- |
| ८. | ३००००७१०१३ / बीएम | संच क्र. ४ २१० मेगावॅट बॉयलरच्या आरएलए अभ्यासाचे काम करण्यासाठी कंत्राट कामाचे स्वरूप व परिशिष्ठ १ नुसार. | ६,८०,८६५/- / १०,३५०/- |
| ९. | ३००००७१०३६ / एच.आर. | एच.आर. (डिस्पॅच) आणि सुरक्षा विभागात सहाय्य पुरवण्यासाठी द्विवार्षिक कामाचा करार. | १५,१८,२९०/- / १८,७००/- |
| १०. | ३००००७१०३८ / डब्ल्युटीपी | डब्ल्युटीपी येथे चालकासाह ऑटो रिक्षा सेवा देण्यासाठी वार्षिक कामाचा करार. | ४,३१,६२५/- / ७,८५०/- |
| ११. | ३००००७१०३९ / सीएचपी | सीएचपी मधील इम्पॅक्ट क्रशर I व II साठी कन्झ्यूमेबल क्रशिंग घटक खरेदी करणे. | ७,६६,७६०/- / ११,२००/- |
| १२. | ३००००७०२५० / टेस्टींग | इलेक्ट्रॉनिक ओव्हर करंट रिले ची खरेदी. | ४,७८,५००/- / ८,२८५/- |
| १३. | ३००००७११०८ / सिव्हिल | कॉलनी सिव्हिल मेंटेनन्स कार्यालयाला कुशल व अकुशल सहाय्य पुरविण्यासाठी द्विवार्षिक करार. | २२,२१,५२१/- / २५,७५०/- |
| १४. | ३००००७१११० / ओएस | स्टेज २ येथील विविध संरचनेभोवती काटेरी झुडपे काढण्याचे काम. | १७,५७,८०५/- / २१,१००/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

## थोडक्यात पण महत्वाचे



### घाटमाथ्यावर संततधार पाऊस; पवना धरणातून १०,००० क्युसेकने विसर्ग

**पिंपरी : दैनिक संध्या**

घाटमाथ्यावर पवना धरण क्षेत्रात कालपासून पावसाने चांगलाच जोर धरला आहे. सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. पवना धरण सध्या ९९ टक्के भरले असून धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी पवना नदीपात्रातील विसर्ग वाढविण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. सध्या नदीपात्रात ५,७२० क्युसेक विसर्ग सुरू असून तो वाढवून सकाळी दहा वाजता १०,००० क्युसेक इतका करण्यात आला आहे. पवना धरण प्रकल्प कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सातत्याने पाऊस सुरू असल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. पावसाचे प्रमाण आणि येणारा पाण्याचा प्रवाह लक्षात घेता हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवून १५,००० क्युसेकपर्यंत नेण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सततच्या पर्जन्यामुळे नदी, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ होऊ शकते. त्यामुळे पवना नदीच्या सखल भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने नागरिकांना नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, जनावरे तसेच इतर साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पवना नदी खोऱ्यातील ग्रामस्थ, शेतकरी आणि नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पूर नियंत्रण कक्ष, पवना धरण प्रकल्प पवनानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### इंद्रायणी नगर येथे पैशांच्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

**पिंपरी : दैनिक संध्या**

पैशांच्या वादातून एका तरुणाला जिवे मारण्याच्या उद्देशाने बेदम मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. ही शनिवारी (दि.१) सकाळी साडेनऊच्या सुमारास इंद्रायणीनगर क्रीडा संकुल मैदान, भोसरी येथे घडली. या प्रकरणात दीपाली संदीप डोळस (३३, रा. दिघी रोड, भोसरी) यांनी भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनिल सुभाष लांडे (४१, रा. भोसरी), बापू साहेबराव अहिवळे (४५, रा. भोसरी) आणि राजन जयचंद जिनवाल (४८, रा. सांगोडी, ता. खेड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी फिर्यादीचे पती संदीप डोळस यांच्याशी पैशांच्या कारणावरून वाद घातला. त्यानंतर "याला जिवंत सोडायचे नाही," असे म्हणत तिघांनी मिळून त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत संदीप यांच्या पोटात रक्तस्त्राव झाला असून कंबरेखाली गंभीर दुखापत झाली आहे. पोलिसांनी राजन जिनवाल याला ताब्यात घेतले आहे.

### अपयशाची भीती बाळगू नका, सकारात्मक विचार करा, यश मिळेल : सिध्दार्थ जाधव

**पिंपरी : दैनिक संध्या**



जीवनात कधीही न्यूनगंड आणि अपयशाची भीती बाळगू नका. नेहमी प्रयत्नशील रहा, धाडसी बना. कोणतीही कृती पूर्ण क्षमतेने, समर्पण भावनेने आणि सकारात्मक विचाराने केल्यास नक्कीच यश मिळेल, असा सल्ला सुप्रसिध्द मराठी अभिनेता सिद्धार्थ जाधव याने तरूणाईला दिला. चिंचवड येथे प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि दिशा सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिद्धार्थ जाधवशी दिलखुलास गप्पा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास दीड तास चाललेल्या या कार्यक्रमात सिध्दार्थने विद्यार्थ्यांशी अगदी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरेही दिली. यावेळी प्रतिभा इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव दीपक शहा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वनिता कुऱ्हाडे, दिशा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर यांच्यासह राजेंद्र करपे, गोरख भालेकर, सचिन साठे, नाना शिवले, संतोष बाबर, अविनाश ववले, नंदकुमार कांबळे, संतोष चांदेरे आदी उपस्थित होते. सिध्दार्थ म्हणाला की, मला माझ्या दिसण्याचा न्यूनगंड होता. स्वतःमध्ये आहे. ते प्रथम स्वीकारावे आणि स्वतःवर प्रेम करायला शिकले पाहिजे. मला माझा 'आरसा' देखील प्रेरणा देतो. स्वतःच्या क्षमता ओळखता आल्या पाहिजे. कोणतीही कृती करताना सर्वस्व झोकून दिले द्या व समर्पण भावनेने करा. ते तुमच्यासाठी सर्वोत्तमच असेल. जीवनात आपण नेहमी दुसऱ्यांच्या विचारांनुसार वागू लागतो, ते चुकीचे आहे. सिध्दार्थ म्हणाला, जगात तुमचे आई-वडील हेच तुमचे 'बेस्ट फ्रेंड' आहेत. त्यांना कधी 'इमोशनल ब्लॅकमेल' करू नका. त्यांच्याशी नेहमी आदरयुक्त संवाद ठेवा. माझे आई-वडील माझ्यासाठी प्रेरणादायी आहेत. महाराष्ट्र शासनाने मला व्यसनमुक्तीचा 'ब्रँड अँबेसिडर' केले, हा माझ्या आई-वडिलांचा व त्यांनी माझ्यावर केलेल्या संस्काराचा सन्मान होता, असे मी मानतो.

### नोकरीच्या प्रस्तावामुळे हालचालींना वेग

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प तब्बल 15 वर्षांपासून ठप्प आहे. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर झालेल्या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला. तर, 13 जण जखमी झाले. त्यापैकी जखमींना महापालिकेत नोकरी देण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. तो फेरप्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्यांना नोकरी मिळाल्यास पवना जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागू शकतो, असा विश्वास महापालिका प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे. पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाच्या विरोधात मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर बऊर टोलनाका येथे 9 ऑगस्ट 2011 ला रास्ता रोको आंदोलन केले होते. आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी गोळीबार केल्याने तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तर, 13 जण जखमी झाले. त्या दिवसापासून तो प्रकल्प अपूर्ण स्थितीत बंद आहे. भारतीय किसान संघाने या प्रकल्पाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका फेटाळण्यात आली होती. त्या निर्णयाविरोधात भारतीय किसान संघाने 27 जानेवारी 2010 ला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे अपिल केले होते.

# केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मागणी : महापालिकेकडून पंतप्रधान कार्यालयाची दिशाभूल

■ पिंपरी (दै. संध्या)



मोशी येथील कचरा डेपोतील कचऱ्याचा डोंगर वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या अनधिकृत तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. हा प्रकल्प उभारताना महापालिकेने चुकीची कागदपत्रे सादर करून पंतप्रधान कार्यालयाची दिशाभूल केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय समितीकडून सखोल चौकशी करावी अशी मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे अँटोनी लारा रेन्यूएबल कंपनीच्या माध्यमातून १४ मेगावॅट क्षमतेचा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प उभारला आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर वैज्ञानिक कचरा व्यवस्थापन, स्वच्छ पर्यावरण आणि ऊर्जा निर्मिती या उद्देशाने उभारण्यात आला आहे. १ ऑगस्ट २०२३ रोजी आपल्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले होते. मात्र, या प्रकल्पाच्या कार्यालयीन इमारतीचा पहिला व दुसरा मजला बेकायदेशीररीत्या बांधण्यात आला होता. महापालिकेने चुकीची कागदपत्रे सादर करून पंतप्रधान कार्यालयाची दिशाभूल केल्याची शक्यता आहे. जर हे सत्य असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब असून तिची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

८ जुलै २०२६ रोजी झालेल्या मुसळधार पावसादरम्यान प्रकल्प परिसरात साठवून ठेवलेला कचऱ्याचा डोंगर घसरल्यामुळे इमारत कोसळली. या भीषण दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. प्रथमदर्शनी ही घटना सुरक्षा मानकांचे पालन, देखभाल व्यवस्था तसेच संबंधित अधिकारी व यंत्रणांच्या जबाबदारीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करण्यात यावी. तसेच, या दुर्घटनेत किंवा प्रकल्पातील कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेस जबाबदार असलेल्या अधिकारी, संबंधित संस्था व कंपनीविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. याशिवाय, पंतप्रधान कार्यालयाला चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या व्यक्तींवरही योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. यासोबतच, देशभरात सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर कार्यरत असलेल्या सर्व वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पांच्या सुरक्षा मानकांची, संरचनात्मक गुणवत्तेची आणि कार्यपद्धतीची व्यापक तपासणी करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळता येईल, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली आहे.

## पवना धरण १००% भरले तरी १५% पाणी कपात का? : विश्वजीत बारणे

■ पिंपरी (दै. संध्या)



पवना धरण पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० टक्के भरले असतानाही पिंपरी-चिंचवड शहरावर १५ टक्के पाणी कपात कशासाठी लादली आहे. ही कपात तात्काळ रद्द करून शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी ठाम मागणी शिवसेनेचे गटनेते व नगरसेवक विश्वजीत बारणे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. गटनेते विश्वजीत बारणे म्हणाले, पवना धरणातील जलसाठा मुबलक असून पवना नदी दुथडी भरून वाहत आहे. शहरासाठी भविष्यात पाण्याची कोणतीही टंचाई नसतानाही पालिका प्रशासनाकडून १५ टक्के पाणी कपात कायम ठेवण्यात आली आहे. या अवाजवी निर्णयामुळे शहरातील लाखो नागरिकांना, विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना तीव्र मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक भागात कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत.पाणी मुबलक असताना कपात कायम ठेवण्यामागे कोणतेही ठोस किंवा वस्तुनिष्ठ कारण नाही. या निर्णयामुळे पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, कृत्रिम पाणीटंचाई निर्माण करून टँकर लॉबीला आणि टँकर संस्कृतीला प्रोत्साहन दिले जात आहे की काय, अशी शंका नागरिकांमधून व्यक्त होत आहे. जनहिताचा आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करून प्रशासनाने ही १५ टक्के पाणी कपात त्वरित मागे घ्यावी आणि शहरातील सर्व भागांत समान, पुरेसा आणि सुरळीत पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी बारणे यांनी केली आहे.

## नवी सांगवीत पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया

■ पिंपरी (दै. संध्या)



एका बाजूला शहराला पाणीपुरवठा करणारे पवना धरण शंभर टक्के भरलेले असून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला नवी सांगवी परिसरातील अनेक भागांमध्ये आजही एका दिवसाआड केवळ दोन तास पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नवी सांगवीतील फेमस चौक येथे पाणीपुरवठा विभागाच्या पाइपलाइनच्या कामादरम्यान लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचा आरोप मानवी हक्क संरक्षण आणि जागृती संघटनेचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांनी केला आहे. समतानगर, गणेशनगर, संत तुकारामनगर, समर्थनगर यांसह अनेक उपनगरांमध्ये नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा सहन करावा लागत असताना दुसरीकडे पाण्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. जोगदंड यांनी सांगितले की, फेमस चौक येथे सुरू असलेल्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असल्याची माहिती त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे उपशहर अभियंता (पाणीपुरवठा विभाग) अजय सूर्यवंशी, ह प्रभाग पाणीपुरवठा अधिकारी संभाजी गायकवाड आणि कनिष्ठ अभियंता सोनाली खेमकर यांना दूरध्वनीद्वारे दिली आहे. संबंधित ठिकाणचा व्हिडिओही अधिकाऱ्यांना पाठविण्यात आला असून, तरीही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. "एकीकडे नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे, तर दुसरीकडे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. या पाण्याच्या नासाडीला आणि नागरिकांच्या हालअपेष्टांना जबाबदार कोण?" असा सवाल जोगदंड यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, कामाच्या ठिकाणी महापालिका किंवा ठेकेदाराकडून कोणतेही बॅरिकेडिंग अथवा सूचना फलक लावण्यात आलेले नसल्याचेही त्यांनी नमूद केले. यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय, फेमस चौक परिसरात पाणीपुरवठ्याच्या कामामुळे मंगळवारी संध्याकाळी सुमारे अर्धा किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, त्या ठिकाणी वाहतूक पोलिस किंवा ठेकेदाराचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे वाहतूक व्यवस्थापनाचा अभाव आणि कामाच्या नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पाणीटंचाई, पाण्याची नासाडी आणि वाहतूक कोंडी या तिहेरी समस्यांमुळे नवी सांगवीतील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## रहाटणी–पिंपळे सौदागरमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची मोफत ओपीडी सेवा सुरू

नाना काटे सोशल फाउंडेशन व डी. वाय. पाटील आयुर्वेद हॉस्पिटलचा संयुक्त उपक्रम; महिलांची प्रसूती व आवश्यक शस्त्रक्रियाही मोफत

■ पिंपरी (दै. संध्या)



नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि मोफत आरोग्यसेवा त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हावी, या उद्देशाने डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पिंपरी आणि नाना काटे सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रहाटणी–पिंपळे सौदागर परिसरात तज्ज्ञ डॉक्टरांची मोफत बाह्यरुग्ण तपासणी (ओपीडी) सेवा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते करण्यात आले. रहाटणी–पिंपळे सौदागर परिसरातील श्री स्वामी समर्थ केंद्र तसेच नाना काटे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर ही मोफत आरोग्यसेवा नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. १ ऑगस्टपासून प्रत्येक मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत. या बाह्यरुग्ण सेवेत स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, कान-नाक-घसा यांसह सर्वसाधारण आजारांची तपासणी अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांकडून केली जाणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना विविध आजारांच्या उपचारांसाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नसून घराजवळच दर्जेदार आरोग्यसेवेचा लाभ मिळणार आहे. या उपक्रमांतर्गत आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, डी. वाय. पाटील आयुर्वेद हॉस्पिटल, पिंपरी येथे महिलांची प्रसूती तसेच प्रसूतीसंदर्भातील आवश्यक शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. विशेषतः गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील महिलांसाठी ही सुविधा मोठा दिलासा देणारी ठरणार आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. नागरिकांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा मोफत उपलब्ध झाल्याने वेळ आणि खर्चाची बचत होणार आहे. अधिकाधिक नागरिकांनी या आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केले. उद्घाटनप्रसंगी हॉस्पिटलचे डीन व प्राचार्य डॉ. प्रशांत खाडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. ममता नाकाळे, डॉ. नीलिमा धारकर, डॉ. केतन जंगले, डॉ. इंद्रजीत घाडगे, डॉ. संपदा वैद्य, डॉ. आरती जाधव, व्यवस्थापक भूषण कुदळे, युवा नेते उमेश काटे, ह.भ.प. विलास अण्णा काटे, पोपटभाऊ जगताप, राजू टकले, संदीप जगताप, प्रतीक काटे, अतुल माने, उमेश इनामके यांच्यासह सनक्रिस्ट सोसायटीचे अध्यक्ष विशाल जाधव, सचिव मिलिंद माने, खजिनदार मनीष दारक व पदाधिकारी उपस्थित होते.

## दादा हे, शिक्षण राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन मानणारे द्रष्टे नेते होते : डॉ भरत चव्हाण

■ पिंपरी (दै. संध्या)



काही लोकांचे आयुष्य त्यांनी जगलेल्या वर्षांनी नव्हे, तर त्यांनी बदललेल्या आयुष्यांनी मोजले जाते. जगासाठी ते डॉ. डी. वाय. पाटील होते - एक शिक्षणतज्ज्ञ,शैक्षणिक संस्था निर्माते, परोपकारी, लोकसेवक आणि शिक्षण हे राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन आहे असे मानणारे द्रष्टे नेते.पण माझ्यासाठी ते फक्त 'दादा' आहेत.लहान असताना, अनोळखी लोक त्यांचे नाव इतक्या आदराने का घेतात किंवा हजारो विद्यार्थी त्यांना पाहून हात का जोडतात, हे मला पूर्णपणे समजायचे नाही. एक मूल म्हणून मला वाटायचे की, प्रत्येक आजोबा शाळा बांधतात, विद्यापीठांची स्वप्ने पाहतात आणि प्रत्येक तरुण मनाला संधी मिळाली पाहिजे यावर विश्वास ठेवतात. पण काळासोबत मला हे समजू लागले की, मला वारसाने संपत्ती नाही, तर एक जबाबदारी मिळाली आहे.त्यांची गोष्ट भव्य कॅम्पस किंवा औपचारिक सभागृहांमधून सुरू झाली नाही. तर तिची सुरुवात ग्रामीण महाराष्ट्रातून झाली, जिथे परिस्थितीपेक्षा स्वप्ने मोठी होती आणि प्रत्येक अडचणीवर जिद्द भारी पडत होती.त्यांनी स्थापन केलेल्या प्रत्येक संस्थेवर एका साध्या विश्वासाची छाप होती—की शिक्षण एखाद्या व्यक्तीचे, कुटुंबाचे आणि पर्यायाने राष्ट्राचे नशीब बदलू शकते.त्यांनी उभारलेल्या संस्थांच्या आवारातून चालताना मला जाणवले की, इमारती या काँक्रीटच्या बनतात, पण वारसा (लेगसी) मूल्यांमधून निर्माण होतो. त्यांची सर्वात मोठी उपलब्धी त्यांच्या नावावर असलेल्या महाविद्यालयांची किंवा विद्यापीठांची संख्या ही कधीच नव्हती. तर ती होती, त्यांनी त्या असंख्य तरुणांना दिलेला आत्मविश्वास, ज्यांना विश्वास होता की त्यांचे भविष्य त्यांच्या भूतकाळापेक्षा नक्कीच उज्ज्वल असू शकते.जर त्यांचे जीवन एका जरी तरुणाला मोठी स्वप्ने पाहण्यासाठी, अधिक परिश्रम करण्यासाठी आणि नम्रतेने समाजाची सेवा करण्यासाठी प्रेरित करू शकले, तर माझ्या आजोबांनी ज्या ध्येयासाठी आपले आयुष्य समर्पित केले, ते उद्दिष्ट खऱ्या अर्थाने पूर्ण होईल.

# कौटुंबिक जमिनीच्या व्यवहारात फसवणूक करून धमक्या

## बांधकाम व्यावसायिक कुणाल चोरडिया विरोधात तातडीने गुन्हा दाखल करा : विनोद धुमाळ

■ पिंपरी (दै. संध्या)



भोसरी येथील कौटुंबिक मिळकतीच्या विकासाच्या व्यवहारात विशाल चोरडिया कन्ट्रक्शन प्रा. लि. चे डायरेक्टर कुणाल दिलीप चोरडिया यांनी आर्थिक फसवणूक, विश्वासघात आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा गंभीर आरोप करत विनोद अनंता धुमाळ यांनी आज (दि.३) पिंपरी येथील नमस्कार हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. कुणाल चोरडिया या व्यावसायिकांविरोधात तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी यावेळी दापोडी पोलिसांकडे केली आहे.

यावेळी धुमाळ म्हणाले की, वडील दिलीप मोतीलाल चोरडिया, मुलगा कुणाल दिलीप चोरडिया आणि मध्यस्थी प्रफुल्ल इनामदार यांच्या सोबत व्यवहाराची बोलणी झाल्यानंतर दि. २२/१२/२००६ रोजी कुलमुखत्यारपत्र दस्त नं. १०३९७/२००६ व विकसन करारनामा दस्त नं. १०३९६/२००६ अन्वये मा. दुय्यम निबंधक कार्यालय हवेली नं. १७ मध्ये कायदेशीररीत्या कुणाल चोरडिया यांच्या नावे नोंदविण्यात आलेला आहे. सदर दस्तांवाये कुणाल दिलीप चोरडिया हा आम्हास सदर मिळकतीच्या विकसनाच्या बदल्यात व्यावसायिक बांधकामातील तळ मजल्यावर एक दुकान तसेच व ६५० चौ.फुटाचा सुपर बिल्ट अपचा एक फ्लॅट चार वर्षात देण्याचे मान्य व कबूल केलेले होते.या आश्वासनावर विश्वास ठेवून कुटुंबाने मिळकत विकासासाठी देण्यास संमती दर्शविली. मात्र, व्यवहार झाल्यानंतर जवळपास २० वर्षे उलटूनही विकासकाम सुरू झाले नाही आणि दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात आली नाही.

अनेक वेळा संबंधितांकडे पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने देण्यात आली. अखेर मोबदला अथवा मिळकत परत मिळावी, अशी मागणी केल्यानंतर यावेळी कुणाल चोरडिया आणि प्रफुल्ल इनामदार यांनी धमकावण्यास सुरुवात केली. "तुला काय करायचे ते कर आम्ही तुझ्या सारखे हजार लोक बघितले आहे आणि तुम्ही आमचे काही वाकडे करू शकणार नाही तुला आमच्याकडून काही मिळणार नाही आणि जर आमच्याशी पंगा घेतला तर तुला खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलची खडी फोडायला पाठवेन मग रहा ६०० स्के. फुट मध्ये अशी धमकी दिली आहे" त्यावेळी कुणाल चोरडिया तेथेच होता त्याने मला शिवीगाळ करण्यास सुरवात केली व शर्टाची कॉलर पकडून म्हणाला की, आमच्या नांदी लागू नको आमच्याकडे खूप पैसे आहेत आम्ही कोणालाही खरेदी करू शकतो आणि जास्त नाटक केल तर तुला कुठे मारून गायब करेन हे तुला आणि तुझ्या घरच्यांना कळणार नाही. "माझी मोठ्या मोठ्या भाई लोकांशी चांगली ओळख आहे आणि आमचे सारखे सोबत उठणे बसने आहे, अशी धमकी दिली आहे आणि तुला काही मिळणार नाही तुला कुठल्या पोलीस स्टेशनाला जायचे तिकडे जा आमचे कोणी काही वाकडे करू शकणार नाही.या संदर्भात दापोडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली असूनही अद्याप संबंधितांविरोधात अपेक्षित कारवाई झालेली नाही."सामान्य नागरिकाला न्याय मिळण्यासाठी वारंवार पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवावे लागत असतील, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करावा," अशी मागणी धुमाळ यांनी केली. माझी कोणाशीही वैयक्तिक वैरभावना नाही. मात्र माझ्या कुटुंबाची फसवणूक झाली असून मला आणि माझ्या कुटुंबाला न्याय मिळावा, एवढीच आमची अपेक्षा आहे. व्यवहाराशी निगडित कागदपत्रे, तक्रारींच्या प्रती आणि इतर माहितीही पोलिसांना दिली आहे. तसेच, या प्रकरणात न्याय मिळाला नाही तर पुढील काळात वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी आणि राज्य शासनाकडे दाद मागण्याबरोबरच लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही धुमाळ यांनी दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संत सोपानकाकांच्या पादुकांवर अभिषेक

**जेजुरी : दैनिक संध्या**

दिनांक 4 बहुजन समाजाचा लोकदेव व महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या नगरीत संत सोपानकाका महाराज पालखीचे दिनांक 4 रोजी सकाळी आगमन झाले. खंडोबा देवाचे मानकरी इनामदार शामकाका पेशवे यांच्या वाड्यात संत सोपानकाका यांच्या पादुकांवर अभिषेक पूजा घालण्यात आली. संत सोपानकाका महाराज यांचा पालखी सोहळा दिनांक 3 रोजी दौंडज येथे मुक्कामी होता. दि 4 रोजी पहाटे हा सोहळा जेजुरी कडे मार्गस्थ झाला. सकाळी साडे आठ वाजता जेजुरी शहरात या सोहळ्याचे जेजुरी कर नागरिकांनी स्वागत केले. सकाळी 9 वाजता खंडोबा देवाचे मानकरी इनामदार शाम काका पेशवे, सचिन पेशवे यांच्या निवासस्थानी संत सोपानकाका यांच्या पादुकांवर अभिषेक व पूजा करण्यात आली. यावेळी संत सोपानकाका पालखी सोहळ्याचे गोपाळ महाराज गोसावी, सोहळा प्रमुख त्रिभुवन गोसावी, श्रीकांत गोसावी, चोपदार हरीभाऊ शिंदे, वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी उपस्थित होते. हजारो भाविकांनी संत सोपानकाका पालखीचे दर्शन घेतले. सकाळी साडे अकरा वाजता संत सोपानकाका महाराज पालखी सोहळ्याचे साकुर्डे मार्गे सासवड कडे प्रस्थान झाले.

### परतीच्या प्रवासात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे जेजुरीत स्वागत

**जेजुरी : दैनिक संध्या**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत परतीच्या प्रवासात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे पहाटे आगमन झाले . यावेळी संत काशिनाथ महाराज विठ्ठल मंदिर ट्रस्ट जेजुरी, श्री मार्तंड देवसंस्थान व ग्रामस्थांच्या वतीने या सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. दिनांक 3 रोजी महर्षी वाल्मिकीच्या समाधी भूमी असणाऱ्या वाल्हे येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मुक्कामी होता. दि 4 रोजी पहाटे चार वाजता हा सोहळा जेजुरी कडे मार्गस्थ झाला. पहाटे साडे सहा वाजता या सोहळ्याचे जेजुरीत आगमन झाले. जेजुरी येथील विठ्ठल मंदिरात संत काशिनाथ महाराज विठ्ठल मंदिर ट्रस्ट, श्री मार्तंड देवसंस्थान व जेजुरी ग्रामस्थांच्या वतीने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. सकाळी साडे आठ वाजता विठ्ठल मंदिरात माऊलींच्या पादुकावर अभिषेक , पूजा करण्यात आली. यावेळी पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजन नाथ, जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे, ॲड पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, विठ्ठल मंदिर ट्रस्टचे हभप सयाजी महाराज मोहरकर आदी उपस्थित होते. माऊलींच्या दर्शनासाठी सकाळ पासूनच भाविकांनी विठ्ठल मंदिरात रांगा लावल्या होत्या. विठोबा रुखमाई, आणि माऊलींच्या जयघोषात भाविक दंग झाले होते. यावेळी उद्योजक सुनील रुकारी, खुडे बंधू यांच्या वतीने वारकरी बांधवांना अन्न दान करण्यात आले. दुपारी भोजनानंतर साडे बारा वाजता संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सासवड कडे मार्गस्थ झाला.




### चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेला पुरस्कार प्रदान

**पिंपरी : दैनिक संध्या**

आंत्रप्रेन्यूअर्स इंटरनॅशनलच्या वतीने जेआरडी टाटा यांच्या जयंती निमित्त पिं- चिं- चाकण परिसरतील उद्योजकांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेला उद्योजक सपोर्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष जयदेव अक्कलकोटे यांनी हा पुरस्कार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कोथरूड येथील महा. एज्यू. सोसायटीच्या सभागृहात कार्यक्रम पार पडला. यावेळी तंत्रज्ञान तज्ञ,लेखक डॉ अच्युत गोडबोले,आंत्रप्रेन्यूअर्स इंटरनॅशनलचे अध्यक्ष अमोल जाधव, सचिव सुभाष माईणकर, खजिनदार सुनील थोरात, समन्वयक अतुल कुलकर्णी, चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष जयदेव अक्कलकोटे,सचिव निवास माने,खजिनदार किसन गायकवाड,संचालक सुधीर भांदुर्गा, प्रवीण शिंदे, दत्तात्रय दगडे, लक्ष्मण काळे, प्रशांत गोरे, रामेश्वर पवार, प्रफुल्ल कालंकार आदी मान्यवर उपस्थित होते. श्री अक्कलकोटे म्हणाले कि, चाकण परिसरातून औद्योगिक क्षेत्रातून शासनाला सर्वाधिक महसल मिळतो. मात्र याच औद्योगिक परिसरात समस्या मोठ्या प्रमाणात असल्याची खंत व्यक्त केली.



### क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**चाकण : दैनिक संध्या**

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांना चाकण येथे अभिवादन करण्यात आले. चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व माजी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांच्या हस्ते प्रारंभी नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी गटनेते नितीन गोरे, नगरसेवक मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, उद्योजक राहुल कांडगे, महेश शेवकरी, रूपाली कांडगे, विशाल नायकवाडी, ॲड. प्रकाश गोरे, साधना गोरे, पुनम शेवकरी, आरती परदेशी, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, अनिता घोगरे, रणजीत जरे, समीर सिकीलकर, गुलाबराव शेवकरी, शाम राक्षे, संतोष लेंडघर, प्रीतम परदेशी आदी उपस्थित होते. डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषा गोरे यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याच्या गौरव केला.

# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६

## ठाणे जिल्ह्यात कर्जमुक्तीच्या पहिल्या टप्प्याला वेग; आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण करण्याचे आवाहन

■ भिवंडी (सुनील झळके) :

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कमाल रु.२.०० लाख मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील पात्र शेतकरी बांधवांना या योजनेचा तात्काळ लाभ मिळावा यासाठी आधार प्रमाणीकरणाची (Aadhar e-KYC) प्रक्रिया सध्या गतिमान करण्यात आली आहे. ३१ जुलै २०२६ अखेर प्राप्त झालेल्या यादीतील जिल्ह्यातील एकूण १० हजार ९६२ पात्र खातेदार शेतकऱ्यापैकी ८ हजार ४४४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. तर उर्वरित २ हजार ५१८ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत १६ हजार ८३६ आणि राष्ट्रीयकृत बँकांमार्फत १ हजार २३२ अशा एकूण १८ हजार ०६८ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १० हजार ५२५ आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या ४३७ अशा एकूण १० हजार ९६२ पात्र खातेदार शेतकऱ्यांची पहिली यादी प्राप्त झाली आहे. ३१ जुलै २०२६ अखेर प्राप्त झालेल्या यादीतील ८ हजार ४४४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. तर उर्वरित २ हजार ५१८ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व व्यापारी, राष्ट्रीयकृत बँका आणि जिल्हा अग्रणी व्यवस्थापकांना (LDM) तात्काळ उर्वरित सर्व खात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे निर्देशही डॉ. पांचाळ यांनी दिले आहेत.

आधार प्रमाणीकरणाचे काम सर्व 'आपले सरकार' व 'महा-ई-सेवा' केंद्रांवर सुरू असून या कामासाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाऊ नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कर्जमुक्ती योजनेची दुसरी यादी १५ ऑगस्टनंतर प्रसिद्ध केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करताच थकीत कर्जाची रक्कम थेट त्यांच्या खात्यावर वर्ग केली जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना चालू खरीप हंगामासाठी पुन्हा नवीन पीककर्ज मिळणे शक्य होणार आहे. पात्र सभासदांच्या याद्या संबंधित बँक शाखा, सेवा सहकारी संस्था, ग्रामपंचायत आणि तलाठी कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या 'आपले सरकार' किंवा 'महा-ई-सेवा' केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण त्वरित पूर्ण करून घ्यावे; यासाठी कोणतेही शुल्क द्यायचे नाही.

ज्या शेतकऱ्यांनी अद्याप 'ॲग्रीस्टॅक' (AgriStack) नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती तात्काळ करून घ्यावी.

याबाबत काही अडचण असल्यास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच प्रमाणीकरणात अडचण आल्यास संबंधित सेवा सहकारी सोसायटीचे गटसचिव किंवा बँक निरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ व जिल्हा उपनिबंधक डॉ. मांडे यांनी केले आहे.

## जयहिंद पॉलीटेक्निक, कुरण येथे नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसीय इंडक्शन कार्यक्रमास प्रारंभ

■ पुणे (दै. संध्या)

जयहिंद पॉलीटेक्निक, कुरण येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसीय इंडक्शन कार्यक्रम (स्वागत समारंभ) आयोजित करण्यात आला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. आर. पोखरकर यांनी दिली.









कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष मा. श्री. जितेंद्र शेठ गुंजाळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्थेच्या संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे, जयहिंद आयटीआयचे प्राचार्य श्री. सुभाष आंद्रे तसेच संस्थेचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एस. आर. पोखरकर यांनी नवप्रवेशित विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे स्वागत करून डिप्लोमा अभियांत्रिकी अभ्यासक्रम, महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण तसेच परीक्षापद्धतीची सविस्तर माहिती दिली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष मा. श्री. जितेंद्र शेठ गुंजाळ यांनी "डिप्लोमा अभियांत्रिकीमधील करिअरच्या संधी" या विषयावर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक ज्ञान मिळवून स्पर्धात्मक युगात स्वतःला सक्षम सिद्ध करावे, असे आवाहन त्यांनी केले. संस्थेच्या संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे यांनीही मनोगत व्यक्त करत नवप्रवेशित विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे स्वागत केले आणि विद्यार्थ्यांना उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत महाजन यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पी. व्ही. औटी यांनी केले.

## खळद येथून सासवडकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान

■ पुरंदर (दै. संध्या)

आषाढी एकादशीच्या पावन वारीचे औचित्य साधत, श्री संत चांगावटेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे खळद येथून सासवडकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" आणि "जय जय राम कृष्ण हरी" या अखंड नामघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ, मृदुंग, वीणा आणि अभंगांच्या सुरावटींमध्ये वारकरी भक्तिभावाने पालखी सोहळ्यात सहभागी झाले. प्रस्थानापूर्वी श्री संत चांगावटेश्वर महाराजांच्या पादुकांचे विधिवत पूजन, आरती व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर पालखीचे प्रस्थान होताच भाविकांनी पुष्पवृष्टी करून पालखीचे दर्शन घेतले. भगव्या पताका, तुळशीमाळ धारण केलेले वारकरी, शिस्तबद्ध दिंड्या आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. आषाढी एकादशी ही वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पवित्र मानली जाते. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह अनेक संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत असताना, श्री संत चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळाही



भक्ती, समता, सेवा आणि मानवतेचा संदेश देत पुढे सरकत आहे. वारकरी परंपरेतील शिस्त, सामूहिक भक्ती आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर हीच या वारीची खरी ओळख असल्याचे यावेळी पाहायला मिळाले. मार्गावरील विविध गावांमध्ये ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे पिण्याच्या पाण्याची, फराळाची व अन्य आवश्यक सुविधांची व्यवस्था करून स्वागत केले. अनेक भाविकांनी पालखीचे दर्शन घेऊन विठ्ठल चरणी प्रार्थना केली. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविक मोठ्या उत्साहाने या सोहळ्यात सहभागी झाले होते. खळद येथून प्रस्थान केलेला श्री संत चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळा सासवडमार्गे पुढील प्रवासासाठी रवाना झाला असून, आषाढी वारीच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्ती, श्रद्धा आणि विठ्ठलनामाच्या गजराने भारावून गेला आहे.

## ४ महिन्यात सुमारे ८० हजार दाखले वाटप

### उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे

■ बारामती (दै. संध्या)

आपले सरकार सेवा पोर्टलच्या माध्यमातून १ एप्रिल ते आज अखेर बारामती-इंदापूर उपविभागातील विद्यार्थी आणि नागरिकांना एकूण ७९ हजार ९९९ इतके दाखले वाटप करण्यात आले आहेत, अशी माहिती उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली आहे.

नागरिकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पध्दतीने देण्याकरीता उपविभागाने नियोजनपद्धतीने काम करत दाखलयांचे वितरण करण्यात आले आहे. एकूण २५१ महा-ई-सेवा केंद्र व आपले सरकार केंद्र तसेच तालुक्यातील प्रत्येकी १ सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून उत्पन्नाचे प्रमाणपत्र ४२ हजार ७, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र १२ हजार ३४२, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र १२ हजार ७६६, जात प्रमाणपत्र १० हजार ९९७, केंद्र शासन आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रमाणपत्र ६८४ व राज्य शासन आर्थिकदृष्ट्या दूर्बल प्रमाणपत्र ५१३, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र ३०५, तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र २४५, अल्पभूधारक प्रमाणपत्र १४० आदी विविध सेवांमधून प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहेत. शालेय विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश घेण्याकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व दाखल्यांचे मुदतीत वितरण करणेत आले आहे, अशी माहिती श्री. दिघे यांनी दिली आहे.

**विविध सेवांमधून प्रमाणपत्र**

एकूण २५१ महा-ई-सेवा केंद्र व आपले सरकार केंद्र तसेच तालुक्यातील प्रत्येकी १ सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून उत्पन्नाचे प्रमाणपत्र ४२ हजार ७, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र १२ हजार ३४२, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र १२ हजार ७६६, जात प्रमाणपत्र १० हजार ९९७, केंद्र शासन आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रमाणपत्र ६८४ व राज्य शासन आर्थिकदृष्ट्या दूर्बल प्रमाणपत्र ५१३, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र ३०५, तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र २४५, अल्पभूधारक प्रमाणपत्र १४० आदी विविध सेवांमधून प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहेत.

## मफतलाल विद्यालयात विद्यार्थ्यीनींना सायकल वाटप

■ खारेपाटण (दै. संध्या)

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, खारेपाटण येथील शेठ नवीनचंद्र मफतलाल विद्यालयातील विद्यार्थ्यीनी रोज ७-८किमी अंतर चालत येतात, त्या विद्यालयातील गरीब गरजू,होतकरु मुलींना रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पश्चिमेच्या वतीने सायकल वाटप करण्यात आले.रोटरी क्लब ऑफ खारेपाटण(मंडल-३१७०) आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पश्चिम यांच्या संयुक्त विद्यमाने खारेपाटण व परिसरातील१०होतकरु मुलींना नवीन सायकलचे वाटप करण्यात आले.सायकलींगचे वाटप झाल्यानंतर मुलींच्या चेहऱ्यावरील हास्य सगळ काही सांगून गेले.या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ खारेपाटणचे अध्यक्ष रो.मंगेश ब्रम्हदंडे,मानद सचिव रो.सुबोध देसाई, खजिनदार रो.शर्मिन काझी, उपक्रम प्रमुख-संस्थापक अध्यक्ष रो.दयानंद कोकाटे,प्रशालेचे मुख्याध्यापक मा.श्री.संजय सानप सर, पर्यवेक्षक श्री.संतोष राऊत सर,रो. प्रियेशा अमृते,रो.लक्ष्मीकांत हरयाणा तसेच रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मानद सचिव रो.दत्ता कडुलकर, माजी अध्यक्ष रो.श्रीपाद कुलकर्णी, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर याप्रसंगी उपस्थित होते. तसेच या उपक्रमासाठी रो.अजय गुरसळे यांचेही सहकार्य लाभले.रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पश्चिमचे माजी अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी समुपदेशनाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना कर्तव्यदक्ष असे बहुमोल मार्गदर्शन केले.



# केवळ पावत्यांवर १९४ शिक्षक, ६० पोलीस, ३० महसूल कर्मचारी कार्यरत

■ भिवंडी (सुनील झळके):

अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर आदिवासी म्हणून नोकरी मिळविली.परंतु अद्यापही जातवैधता प्रमाणपत्र सादर न करता केवळ पावत्यांवर अधिकारी, कर्मचारी कार्यरत असल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. यात नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे २०१ शिक्षकांपैकी १९४ शिक्षक पावत्यांवर तर ७ प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, पोलीस विभागातील ६० पोलीस अधिकारी कर्मचारी , महसूल आस्थापना वरील ३० अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहेत.या सर्वांनी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती किनवट यांच्याकडे जातपडताळणीसाठी प्रस्ताव दाखल केले आहे. परंतु त्यांचे जातप्रमाणपत्र वैध की अवैध हा निर्णय समितीकडून न आल्यामुळे ते पावत्यांवरच कार्यरत आहेत. शिक्षक संवर्गातील एकूण २०१ कर्मचाऱ्यांनी आयुष्यातील अर्धी सेवा झाल्यानंतर २०१३ मध्ये आपले प्रस्ताव जातपडताळणीसाठी समितीकडे दाखल केलेले आहेत. यात सर्वात जास्त ११९ प्रकरणे मन्नेरवारलू , कोळी महादेव ४०, महादेव कोळी १२, धनगड ७, ठाकूर ५, छत्री ४, राजगोंड ३, धोबा २, गौड, तडवी, कोळी ढोर, कोळी मल्हार, टाकणकार, आंध, हलबा, भिल्ल,अडवीचिंचेर प्रत्येकी एक अशी आहेत. यातील दोन शिक्षक ३१ जुलै २०२६ रोजी सेवेतून निव्रुत्त होत आहे.तर ऑगस्ट व ऑक्टोबर महिन्यात प्रत्येकी १ निव्रुत होत आहे.७ शिक्षकांचे प्रकरण न्यायालयात आहे.१६८ जणांकडे तहसीलदार यांचे जातप्रमाणपत्र आहे.३३ जणांकडे उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जातप्रमाणपत्र आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग या राखीव प्रवर्गातून जातप्रमाणपत्राच्या आधारे शासकीय, निमशासकिय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर त्यांना सहा महिण्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहेत.परंतु अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनी विहित कालमर्यादेत जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. पोलीस अधिकारी /कर्मचारी ६० पोलीस अधिक्षक आस्थापनेवरील अनुसूचित जमातीच्या आरक्षणातून नियुक्त झालेले अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जातपडताळणीसाठी प्रस्ताव दाखल केलेले असून यात मन्नेरवारलू जमातीचे ३३, महादेव कोळी १४, कोळी महादेव ९, गोंड २, तडवी, पारधी प्रत्येकी एक असे एकूण ६० अधिकारी कर्मचारी पावत्यांवर कार्यरत आहेत. यापैकी तिघांकडे विशेष भूसंपादन अधिकारी यांनी दिलेले व एकाकडे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिलेले जातप्रमाणपत्र आहे.या सर्वांनी अद्यापही जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. महसूल आस्थापनेवरील ३० जिल्हाधिकारी यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जमातीच्या आरक्षणातून नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जातपडताळणीसाठी प्रस्ताव दाखल केलेले आहेत.

यात मन्नेरवारलू १४, कोळी महादेव१०, आंध ३, महादेव कोळी २, कोळी मल्हार १ असे एकूण ३० पोलीस अधिकारी, कर्मचारी जातवैधता सादर न करता केवळ पावत्यांवर कार्यरत आहेत. यापैकी एकाकडे भूसंपादन अधिकारी व दोघांकडे निवडणूक उपजिल्हाधिकारी यांनी दिलेले जातप्रमाणपत्र आहे.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### अडथळे तातडीने दूर करुन त्वरित लाभ द्या

सिंधुदुर्गनगरी : फळपिक विमा भरपाईपासून केवळ तांत्रिक कारणांमुळे एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये. विमा कंपनीकडील सर्व त्रुटी तातडीने दूर करून पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वितरण त्वरित करण्यात यावे, असे निर्देश पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले. पालकमंत्री श्री. राणे यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय कृषी विमा कंपनी (AIC) आणि स्कायमेट वेदर कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची फळपिक विमा संदर्भातील आढावा बैठक दिनांक १ ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश सावंत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ज्ञानेश्वर बढे, भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक अतुल झणकर, स्कायमेट वेदर सर्व्हिसेसचे राज्य व्यवस्थापक संजय मोरे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत फळपिक विमा योजनेच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दरवर्षी फळपिक विम्याची नुकसान भरपाई ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात वितरित केली जाते. मात्र, शासन व जिल्हा प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यंदा जिल्ह्यात प्रथमच जुलै महिन्यातच नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली. विमा कंपनीने कागदपत्रांतील त्रुटींमुळे २ हजार ९६ अर्ज परत पाठविले असून, त्यापैकी सुमारे १ हजार ७५ अर्जांची पूर्तता संबंधित सीएससी (CSC) केंद्रांचे आयडी बंद किंवा ब्लॉक असल्याने होऊ शकलेली नाही.

### जिल्हा परिषद यंत्रणांचा घेतला आढावा

सांगली : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) तसेच अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत जिल्हा परिषद यंत्रणांचा आढावा आज राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला. यावेळी त्यांनी मंजूर कामे तातडीने पूर्ण करावीत. कोणताही निधी परत जाणार नाही, याची दक्षता घेऊन कामकाज करावे, अशा सूचना यंत्रणांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव, पालकमंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील यासह जिल्हा परिषदेतील संबंधित यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्हा वार्षिक योजनेतून ग्रामपंचायतींना जनसुविधा, नागरिकांच्या शिक्षण, रस्ते, पाणी यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करणारी कामे करण्यास प्राधान्य द्यावे. अखर्चित निधी महिनाभरात खर्च करावा. प्रत्येक कामाचा युडीआयडी काढा. लोकप्रतिनिधी व संबंधित अन्य यंत्रणांच्या समन्वयाने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त निधी 100 टक्के खर्च करण्याची कार्यवाही करावी, असे त्यांनी निर्देश दिले. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंजूर कामे सद्यस्थिती, कार्यादेश, कामांची भौतिक व आर्थिक प्रगती, प्रशासकीय मान्यता दिलेली कामे, पूर्ण व रद्द झालेली कामे यांचा यंत्रणानिहाय सविस्तर आढावा घेतला. यामध्ये ग्रामपंचायत, आरोग्य, जलसंधारण, ग्रामीण पाणीपुरवठा, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, बालकल्याण, शिक्षण, बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कामकाजाची माहिती सादर केली.

### चंद्रकांत पाटील यांनी दिले महिलांच्या स्वप्नांना बळ

सांगली : मिरज तालुक्यातील सावळीतील महिलांसाठी सोमवारचा दिवस स्वप्नवत व अविस्मरणीय ठरला. सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील प्रत्यक्ष आपल्या गावात येतात, आपण उभारलेल्या गृहउद्योग केंद्राला भेट देतात, आपल्या उत्पादनांची आत्मियतेने माहिती घेतात आणि स्वयंरोजगार विक्री केंद्राचे लोकार्पण करतात, हा क्षण येथील महिला भगिनींसाठी आनंदाची मर्मबंधातील ठेव बनला. त्यांच्या या "बंधु"तुल्य वावर आणि अनौपचारिक सहजतेने पायावर उभे राहण्याची स्वप्ने पाहणाऱ्या महिला भगिनींच्या स्वप्नांना बळ दिले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मिरज तालुक्यातील सावळी येथे उभारण्यात आलेल्या विजयश्री महिला गृहउद्योग केंद्र आणि नवतेजस्विनी महिला स्वयंरोजगार विक्री केंद्राच्या लोकार्पणाचा हा भावपूर्ण कार्यक्रम पार पडला.

# झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची अंमलबजावणी गतिमान करावी

■ मुंबई (दै. संध्या)

पुणे व मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक करण्यात यावी. यासाठी प्रायोगिक तत्त्वावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि महाप्रीत यांच्या माध्यमातून या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

या बैठकीस पुणे महाप्रीत चे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके, गृहनिर्माण विभागाचे उपसचिव चंद्रशेखर तरंगे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुणे व मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

योजनांच्या प्रभावी नियोजनासाठी सल्लागार संस्था निश्चित करुन पुढील कार्यवाही निश्चित करणे, सुरू असलेल्या योजनांचे सर्वेक्षण, क्षेत्रनिहाय तपशीलांचे परीक्षण तसेच क्षेत्र दुरुस्ती आणि दृश्य पडताळणी यांसह विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि गतिमान करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, म्हाडा तसेच संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय राखून आवश्यक कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना राज्यमंत्री मिसाळ यांनी दिल्या. आवश्यक सर्वेक्षण पूर्ण करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा आणि विकासकामे निर्धारित कालमर्यादेत प्रभावीपणे पूर्ण होतील, यासाठी प्राधान्याने कार्यवाही करावी, असे निर्देशही राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले.



# पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करा

■ मुंबई (दै. संध्या)

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई मार्फत अनुसूचित जातीतील मातंग व त्यातील तत्सम जातीच्या पात्र विद्यार्थ्यांनी 2023, 2024 व 2025 या कालावधीत पीएच.डी करीता अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) देण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे.

आर्टी मार्फत अनुसूचित जातीतील मातंग, मांग, मिनीमादीग, दखनी- मांग, मांग- म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी, मादगी, मादिगा या जातीतील संशोधक विद्यार्थ्यांकरिता 'अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती' (एएसएनआरएफ) योजना राबविली जात आहे. कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती करिता 37 हजार तर वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी 42 हजार रुपये प्रतिमाह अधिछात्रवृत्ती दिली जाणार आहे. त्यानुसार आर्टी, मुंबई संस्थेमार्फत दिनांक 1 जानेवारी 2023 ते 31 डिसेंबर 2025 या कालावधीत पीएच. डी करिता कायम नोंदणी असणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकडून पीएच. डी अधिछात्रवृत्तीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. त्यासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी 4 ऑगस्ट 2026 ते 3 सप्टेंबर 2026 या कालावधीत अर्ज करावे.

या योजनेचा सविस्तर तपशील, कालावधी, निवड पात्रता निकष, मार्गदर्शक सूचना आणि वेळापत्रक इत्यादी बाबतच्या माहितीकरिता आर्टी संस्थेच्या https://www.arti.org.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच संशोधक विद्यार्थ्यांनी https://fellowship.trti-maha.in या लिंकवरून ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कारासाठी २० ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार २०२५ साठी २० ऑगस्ट २०२६ पर्यंत केंद्र शासनाच्या https://awards.gov.in या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन मुंबई शहरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ यांनी केले आहे. साहसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारांतर्गत जमिनीवरील, समुद्रावरील आणि हवाई साहसी उपक्रमांसाठी प्रत्येकी एक पुरस्कार दिला जातो. तसेच साहसी क्षेत्रातील आजीवन योगदान यासाठीही स्वतंत्र पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

या पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या साहसी खेळाडूंची कामगिरी २०२३, २०२४ आणि २०२५ या तीन वर्षांतील असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित कामगिरी जमीन, पाणी किंवा हवाई साहसी उपक्रमांमधील असून ती अतिउत्कृष्ट स्वरूपाची असावी. पुरस्कारासाठीची नामांकने २० ऑगस्ट २०२६ पर्यंत केवळ केंद्र शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर स्वीकारली जाणार असून, ऑफलाइन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे पात्र साहसी खेळाडूंनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.




# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणात कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही

■ मुंबई (दै. संध्या)

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत कोणत्याही समाजघटकावर अन्याय होणार नाही, याची शासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जाईल. ही प्रक्रिया पारदर्शक, कायदेशीर आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने राबविण्यात येत असून, यासाठी समाजाचे सहकार्यही तितकेच महत्वाचे आहे. उपवर्गीकरणासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकतीची सुनावणी व छाननी पूर्ण झाल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली मातंग समाजाच्या विविध मागण्यांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस माजी राज्यमंत्री उत्तमप्रकाश खंदारे, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रभारी सचिव विजय वाघमारे, आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे तसेच मातंग समाजाच्या विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले, न्यायमूर्ती बदर समितीने अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबतचा अहवाल शासनाकडे सादर केला असून, त्यास अद्याप शासनाची मंजुरी मिळालेली नाही. विविध समाजघटकांकडून प्राप्त झालेल्या हरकती, सूचना आणि निवेदनांचा सखोल अभ्यास करून हरकतीची सुनावणी घेण्यात येत आहे. त्यानंतरच उपवर्गीकरणाचा प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल.



# नागरिकांनी कायद्याचे पालन करून नागपंचमी सण साजरा करावा

■ मुंबई (दै. संध्या)

सांगली : मौजे बत्तीस शिराळ्यातील नागपंचमीच्या उत्सवाचे आकर्षण केवळ जिल्ह्यालाच नव्हे, तर राज्याला आहे. या सणाच्या पार्श्वभूमिवर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशांचे व वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ च्या तरतुदींचे पालन होण्यासाठी वन विभाग, महसूल व पोलीस प्रशासन दक्ष असून नागरिकांनी कायद्याचे पालन करून नागपंचमी सण साजरा करावा, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिले.

बत्तीस शिराळा येथील नागपंचमी उत्सव नियोजन बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आयोजित या बैठकीस आमदार सत्यजीत देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, उपवनसंरक्षक सागर गवते, विभागीय वन अधिकारी प्रशांत वरूडे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम, सहाय्यक वनसंरक्षक नवनाथ कांबळे, पोलीस उपअधीक्षक अरुण पाटील, मानद वन्यजीव रक्षक विशाल पाटील, कांचन सुतार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, बत्तीस शिराळ्यातील नागपंचमी उत्सव हा केवळ सांगली जिल्ह्यापूरताच नव्हे, तर राज्यातही प्रसिद्ध आहे. राज्याच्या विविध भागातून अनेक नागरिक ह्या उत्सवासाठी येत असतात. कायद्यातील तरतुदींचे पालन होण्यासाठी वन विभाग, महसूल व पोलीस प्रशासन दक्ष राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष म्हणाले, शिराळा येथील नागपंचमी सणासाठी वन विभाग, महसूल व पोलीस प्रशासनाकडून बंदोबस्त ठेवण्यात येत आहे. वन विभागाकडून या कालावधीत शिराळा व आसपासच्या परिसरात गस्तीसाठी विशेष पथके तयार करण्यात आली.

# राष्ट्रीय स्तरावर शालेय शिक्षणात महाराष्ट्राचे महत्त्वपूर्ण स्थान : मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

शिक्षणाची गुणवत्ता, मातृभाषेचे संवर्धन, इतिहासाची समृद्ध परंपरा आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा यांचा समतोल साधत राज्य शासन विद्यार्थीकेंद्रित शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून राष्ट्रीय स्तरावरही महत्त्वपूर्ण स्थान राखून आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी शालेय अभ्यासक्रमात नशामुक्तीच्या अनुषंगाने पाठ्यक्रमाचा समावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिक्षण विभागाचा आढावा घेतला यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी व शिक्षण विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र पीजीआय 2.0 मध्ये देशात दुसऱ्या स्थानावर कायम आहे. राज्यात पीएम श्री शाळांसह सर्व शाळांमधून चांगले शिक्षण दिले जात आहे. शिक्षण क्षेत्रात अभिनव उपक्रमांची अंमलबजावणी करावी, असे त्यांनी सांगितले. राज्यातील विद्यार्थ्यांचे शालेय आधार प्रमाणीकरण, आरटीइद्वारे 35 लाख विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेचा लाभ, पवित्र पोर्टल, राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी, यासह विविध शैक्षणिक उपक्रमांची त्यांनी यावेळी माहिती घेतली.

राज्य शासनाने शाळांमध्ये नशाविरोधी मार्गदर्शक व समुपदेशन समित्या स्थापन करण्याचा आणि 'ड्रग-फ्री स्कूल' अभियान राबवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. शाळांमधील सुरक्षा, सायबर फसवणूक आणि अमली पदार्थ प्रतिबंधासाठी प्रभावी व कठोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

`शातील एकूण शाळांपैकी ९.३४ टक्के, शिक्षकांपैकी ८.८४ टक्के आणि विद्यार्थ्यांपैकी ७.६९ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. राज्यातील १,०८,०६५ एकूण शाळा मध्ये २,२०,४८,४४३ विद्यार्थी शिक्षण घेत असून विद्यार्थी-शिक्षक प्रमाण २८ : १ आहे. राज्यातील शाळांमध्ये ६४,३४१ शासकीय, २९,४८६ खासगी अनुदानित आणि उर्वरित स्वयंअर्थसहाय्यित तसेच केंद्रीय शाळा आहेत. शालेय शिक्षण व्यवस्थेचा विस्तार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राज्य शासन विविध स्तरांवर सुधारणा राबवत आहे. निपुण महाराष्ट्र अभियान, राष्ट्र प्रथम अभियान, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना शाळेमध्ये आणण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव सारखे कार्यक्रम याबद्दल यावेळी माहिती देण्यात आली.

यावेळी मंत्री दादाजी भुसे यांनी सादरीकरणाद्वारे विभागाच्या वतीने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती दिली. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी शाळांमध्ये नशामुक्ती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे सांगितले. शिक्षकांसाठी एआयसाथीच्या माध्यमातून ऑनलाइन प्रशिक्षण देखील राबविण्यात आले आहे. शिक्षकांचे अभ्यास दौरे, चांगले काम करणाऱ्या शिक्षण समित्या व शिक्षकांच्या सहभागाने उपक्रमांना चालना, दत्तक शाळा, सीएसआर-सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवीन विचार देखील सुरू झाला आहे. यातूनच शासकीय शाळांमध्ये सुपर 100 योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गुणवान शंभर विद्यार्थ्यांना नीट, जेईई परीक्षांचे स्पर्धात्मक चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी निवड केली जाईल. राज्य शासनाच्या प्रयत्नामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाला केंद्र सरकारच्या वतीने एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकात विस्तृत स्थान देण्यात आले आहे. अभ्यासक्रमात याचा अधिक व्यापक समावेश करावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. यासोबतच राज्यातील सर्व शिक्षण मंडळांच्या (एसएससी, सीबीएसई, आयसीएसई, आयबी) शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे व मराठी विषयाची परीक्षा घेणे सक्तीचे केले आहे, याबाबत यावेळी माहिती देण्यात आली.



## थोडक्यात पण महत्वाचे



### PMPML ची 'वर्षा सहल' विशेष पर्यटन बस सेवा सुरू; महापौरांच्या हस्ते उद्घाटन

पुणे : दैनिक संध्या

पुणे महानगर परिवहन महामंडळ (PMPML) च्या वतीने पावसाळी पर्यटनाला चालना देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मार्ग क्र. ९ (अ) 'वर्षा सहल' विशेष पर्यटन बस सेवेचे उद्घाटन आज स्वारगेट येथील बसस्थानकात पुणे महानगरपालिकेच्या महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी PMPML चे संचालक मा. अजय खेडेकर उपस्थित होते. या विशेष पर्यटन बस सेवेच्या माध्यमातून पर्यटकांना पावसाळ्यातील निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेता यावा, यासाठी मुळशी धरण, पळसे धबधबा आणि नयनरम्य सेल्फी पॉईंट अशा आकर्षक पर्यटनस्थळांचा सुरक्षित, आरामदायी आणि आनंददायी प्रवास उपलब्ध करून देण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी बोलताना महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले की, "PMPML चा हा उपक्रम पुणेकरांसाठी आणि पर्यटकांसाठी अत्यंत उपयुक्त असून पावसाळी पर्यटनाला निश्चितच चालना मिळेल. सुरक्षित, किफायतशीर आणि नियोजनबद्ध पर्यटनाची संधी उपलब्ध करून देण्याचा हा स्तुत्य उपक्रम आहे. पुणे महानगरपालिकेच्या सर्व महिला नगरसेविकांनी देखील या विशेष पर्यटन बस सेवेचा लाभ घ्यावा, यासाठी त्यांच्यासाठी विशेष सहलीचे आयोजन करण्यात यावे," अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. यावेळी PMPML चे संचालक मा. अजय खेडेकर यांनी महामंडळाच्या पर्यटन बस सेवेचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी मोठ्या संख्येने या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सदर कार्यक्रमास वाहतूक व्यवस्थापक श्री. यशवंत हिंगे, जनसंपर्क अधिकारी श्री. नागेश गायकवाड तसेच PMPML चे अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पावसाळ्यातील निसर्गरम्य स्थळांचा सुरक्षित व संस्मरणीय अनुभव घेण्यासाठी पुणेकरांनी PMPML च्या 'वर्षा सहल' विशेष पर्यटन बस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शैल फाउंडेशनकडून २०० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य; परीक्षा शुल्कही देणार

आळंदी : दैनिक संध्या



आर्थिक अडचणीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने शैल फाउंडेशन सामाजिक संस्थेच्या वतीने श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तसेच श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिर, आळंदी येथे २०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर व वह्यांचे वाटप करण्यात आले. शैल फाउंडेशन गेल्या १५ वर्षांपासून विविध शाळांमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत आहे. तसेच शिक्षकांसाठी विविध विषयांवरील कार्यशाळा, ई-लर्निंगसाठी आवश्यक साहित्य व सॉफ्टवेअर उपलब्ध करून देणे आणि तंत्रज्ञानविषयक मार्गदर्शन अशा शैक्षणिक उपक्रमांनाही सातत्याने सहकार्य करत आहे. कार्यक्रमास शैल फाउंडेशनचे विश्वस्त दिलीप टिकले, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, विद्यालयाचे प्राचार्य किसन राठोड, मुख्याध्यापक प्रदीप काळे, विद्यार्थी सहाय्यक समितीच्या पर्यवेक्षिका अनिता पडळकर, विठ्ठलदास गुट्टे, सूर्यकांत खुडे, राजू सोनवणे, उमेश कुलकर्णी आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात अजित वडगावकर यांनी शैल फाउंडेशनने गेल्या १५ वर्षांपासून विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या सातत्यपूर्ण योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमामुळे गरजवंत विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळत असून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवी उभारी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. दिलीप टिकले यांनी विद्यार्थ्यांनाच देशाचे भवितव्य संबोधत शिक्षणासोबत संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेमुळे संस्कार ही आपल्या समाजाची ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले. कोणताही विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शैल फाउंडेशन कटिबद्ध असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी या मदतीच्या बळावर ज्ञानार्जन करून जीवनात उच्च स्थान मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच चालू शैक्षणिक वर्षात विद्यालयातील इयत्ता दहावीच्या गरजवंत विद्यार्थ्यांचे बोर्ड परीक्षा शुल्क शैल फाउंडेशनच्या वतीने भरून देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

# विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष भात लावणीचा अनुभव

**बिन भिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरु : ग. दि. माडगूळकर**

■ काळदरी : (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय माहूर या विद्यालयात. बिन भिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरु या ग. दि. माडगूळकरांच्या कवितेला अनुसरून आज ग्रामीण भागातील शेती संस्कृतीची ओळख व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेची भावना रुजावी या उद्देशाने माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर येथे विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष भात लावणी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शेतात उतरून भाताची रोपे लावण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. यावेळी विद्यार्थ्यांना भात लागवडीची पारंपरिक पद्धत, रोपांची योग्य अंतरावर लागवड, पाण्याचे व्यवस्थापन तसेच शेतीतील कष्ट आणि शेतकऱ्यांचे योगदान याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. चिखलात उतरून विद्यार्थ्यांनी उत्साहाने भात लावणी केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रत्यक्षात व्यावसायिक शिक्षणाचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे शेतीविषयीचे ज्ञान तर वाढलेच, शिवाय श्रमाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजले. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार शिक्षक महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, रामचंद्र जगताप, विकास राऊत, स्नेहलता बोरावके, इंद्रभान पठारे, लता गायकवाड व श्रीकांत खोमणे, मंगल जगताप, श्रीकांत गव्हाणे, रामभाऊ कुंभार इ. कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सुरक्षिततेचीही काळजी घेतली. माहूर येथील शेतकरी गोरख ज्ञानोबा शिंगटे यांच्या शेतात इंद्रायणी भात लावणीचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. माहूर येथील शेतकरी गोरख शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून भात लागवडीचे संपूर्ण मार्गदर्शन केले. आधुनिक शेतीतील ट्रॅक्टर द्वारे केली जाणारी चिखलणी, वैज्ञानिक पद्धत, रोपाची निवड, रूपाची लागवड,



खतव्यवस्था पण या विषयी मार्गदर्शन केले. शेतातील श्रमकौशल्य आणि संयम यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी यावेळी घेतला. विद्यालयातील इ. १० वीच्या ३१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उपस्थितांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक जागरूकता वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आधुनिक शिक्षणासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून जीवनोपयोगी ज्ञान देण्याचा विद्यालयाचा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

या आगळ्या - वेगळ्या उपक्रमाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदी काकी जगताप पश्चिम महाराष्ट्र भाजपाचे सरचिटणीस, संस्थेचे सचिव मा. आमदार संजय (चंदुकाका) जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्र बापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. प्रा. एम. एस. जाधव, संस्थेच्या समन्वयक सोनाली ताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा तथा संस्थेच्या विश्वस्त राजवर्धिनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व विश्वस्त डॉ. अस्मिता ताई जगताप ,संस्थेचे सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे, रविंद्रपंत जगताप यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## पूरग्रस्त भागांची उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या पुढाकाराने पाहणी

■ पुणे (दै. संध्या)

औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील मुळा-मुठा नदीलगत दरवर्षी पूरस्थिती निर्माण होणाऱ्या भागांची आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीचे नियोजन पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह पूरग्रस्त भागांची पाहणी केली. हॅरिस ब्रिज परिसर, आदर्श नगर, स्मशानभूमी परिसर, बोपोडी सबवे आणि चंद्रमणी नगर या भूयांमध्ये दरवर्षी पूरस्थिती निर्माण होत असल्याने सुमारे ७०० नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे लागते. या पार्श्वभूमीवर पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नदी सुधार प्रकल्पासह विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. पाहणीनंतर आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नदी सुधार प्रकल्पाची कामे तातडीने सुरू करण्याचे तसेच पूरनियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्याचे निर्देश दिले. या कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी आयुक्तांच्या दालनात



विशेष बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली.

या पाहणीवेळी माजी उपमहापौर सुनिता वाडेकर, नगरसेवक सनी निम्हन, नगरसेविका भक्ती गायकवाड, नगरसेविका सपना छाजेड, आनंद छाजेड, अविनाश कदम, महापालिकेचे उपायुक्त अविनाश सपकाळ, औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक महापालिका आयुक्त विजय नायकल. मुख्य अभियंता राजेश बनकर (पथ विभाग), मुख्य अभियंता मनीषा शेकटकर (विद्युत विभाग) तसेच उपअभियंता खेहा वाघचौरे (भवन विभाग) उपस्थित होते. पूरग्रस्त नागरिकांना वारंवार होणारा त्रास कमी करण्यासाठी दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यावर महापालिका प्रशासनाचा भर असेल असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.



## चाकणला नागरिकांसाठी बैठक व्यवस्थेचे लोकार्पण

■ चाकण (दै. संध्या)

सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून चाकण येथे नागरिकांसाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या बैठक व्यवस्थेचे लोकार्पण करण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व नगरसेविका सुवर्णा राक्षे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका रुपाली कांडगे यांना धन्यवाद दिले आहेत. आर. के. ग्रुप, राहुलदादा कांडगे मित्र परिवार व क्रांतिवीर संघटनेच्या पुढाकारातून हा लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आल्याचे अमर इंगळे, योगेश राजापूरकर व किसनराव कांडगे यांनी सांगितले. परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला व नागरिकांच्या सोयीसाठी वर्दळ व मोक्याच्या ठिकाणी बैठक व्यवस्था, बाक, बेंच बसविण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत स्वप्ननगरी फेज ३, के - १, पी - १ परिसर तसेच सटवाई माता मंदिर परिसरात आकर्षक व मजबूत बाक बसवून ते नागरिकांच्या सेवेत लोकार्पण करण्यात आले आहेत. नागरिकांची रोजची गरज व सोयीचा विचार करून राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

## कडाचीवाडी ग्रामपंचायत पुणे विभागात विशेष पुरस्काराने सन्मानित

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२५-२०२६ अंतर्गत खेड तालुक्यातील कडाचीवाडी ग्रामपंचायतीला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कडाची वाडी, ग्रामपंचायतीच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणीपुरवठा व पाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार म्हणून ७५ हजार रुपये, तसेच पुणे जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल ४ लाख रुपयांचे पारितोषिक दिनांक १ रोजी प्रदान करण्यात आले. असून खेडचे आमदार बाबाजी रामचंद्र काळे यांच्या हस्ते ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार काळे म्हणाले की, या यशामुळे ग्रामीण भागातील स्वच्छता, पाणी व्यवस्थापन आणि लोकसहभागावर आधारित उपक्रमांना नवी प्रेरणा मिळेल. या उल्लेखनीय



कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीचे प्रशासक सुखदेव साळुंखे, विस्तार अधिकारी किसन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी निलेश पांडे, पदाधिकारी, ग्रामस्थ, स्वच्छता कर्मचारी तसेच अभियानाच्या यशात योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य गणेश अरगडे तसेच पंचायत समिती सदस्य महेंद्र मेदनकर उपस्थित होते.

## जनमाहिती अधिकाऱ्याला १० हजाराचा दंड !

### राज्य माहिती आयोगाचा दणका : पुणे जिल्हा परिषदेतील प्रकरण

■ भिवंडी (दै. संध्या)

राज्य माहिती आयोगाने पुणे जिल्हा परिषदेतील जनमाहिती अधिकाऱ्याला तब्बल १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे. आयोगाच्या दणक्याने माहिती अधिकारात माहिती न देणाऱ्या जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

श्रीमती सुरेखा तारडे यांनी जन माहिती अधिकारी शेखर गायकवाड यांच्याकडे माहिती अधिकारात माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. परंतु जनमाहिती अधिकारी शेखर गायकवाड यांनी संबंधितांना कोणतीही माहिती अथवा पत्राद्वारे माहिती देण्याबाबत कळविलेही नाही आणि अर्जाची दखलही घेतली नाही. तसेच अपिलीय अधिकारी तथा



उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात यांनी श्रीमती तारडे यांच्या प्रथम अपिलावरती सुनावणी घेतली नाही. तसेच त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करून दिली नाही.माहिती अधिकाराला केराची टोपली दाखवली. सदर बाब राज्य माहिती आयुक्त यांच्याकडून गांभीर्याने घेत सुनावणी मध्ये श्रीमती तारडे यांनी त्यांचे म्हणणे लेखी निवेदनाद्वारे सादर केले होते. त्यानुसार पुणे जिल्हा परिषदेमधील १०० जणांनी पदोन्नती मिळवतांना मराठी टायपिंग,इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण नाहीत अशांना पदोन्नती देण्यात आल्याचे नमूद केले आहे.तसेच अनेक कर्मचारी हे संगणक परीक्षा म्हणजेच एमएस- सीआयटी परीक्षा उत्तीर्ण नाहीत, सेवापरिक्षा उत्तीर्ण नाहीत. मात्र अधिक्षक व कक्ष अधिकारी या पदावर बेकायदेशीर बढती देऊन शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून देत,संबंधितांवर कारवाई करणेबाबत विनंती केली.


सदर प्रकरणातील गांभीर्य ओळखून राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांच्याकडून जन माहिती अधिकारी म्हणून पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांची नेमणूक केली आहे.त्यानुसार दि.०४/०८/२०२६ पर्यंत माहिती अधिकारातील माहिती देऊन, कार्यवाहीबाबत अहवाल सादर करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

# 'सामाजिक प्रश्नांसाठी आंदोलने करा, एकामागे एक राजीनामे मागण्यासाठी नको'

**केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांचे कॉक्रोच जनता पक्षाला आवाहन**

■ पुणे (दै. संध्या)

लोकशाही राज्यपद्धतीमध्ये आंदोलने करण्याचा आणि आपल्या मागण्या मांडण्याचा सर्वांनाच अधिकार आहे. मात्र, समाजाच्या आणि नागरिकांच्या प्रश्नांवर जरूर आंदोलने करा. एकापाठोपाठ एक राजीनामे यांच्या मागणीसाठी आंदोलने करून आपले बळ वाया घालवू नका, असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कॉक्रोच जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना केले आहे.



यावेळी शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, अण्णा वायदंडे, ब्राह्मण आघाडीचे ॲड. मंदार जोशी, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, नगरसेवक निलेश आल्हट, ॲड. हुलगेश चलवादी, बसवराज गायकवाड, मोहन जगताप, विशाल शेवाळे, उमेश कांबळे, निलेश रोकडे, सुनील गवळी, मुश्ताक बाबर, श्रीकांत कदम, जयदेव रंधवे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या, तरुणांच्या, महिलांच्या, वंचितांच्या, शेतकऱ्यांच्या, भूमीहिनांच्या न्याय्य हक्कांसाठी जरूर आंदोलने करा. मात्र एकाचा राजीनामा घेण्यात यश मिळाल्यानंतर दुसऱ्याचा राजीनामा मागण्यासाठी नव्याने आंदोलने करू नका. विद्यार्थ्यांना अशा आंदोलनात उतरवण्याऐवजी विधायक कार्यक्रम आणि आपले भवितव्य घडवण्यासाठी, आर्थिक उन्नतीसाठी वेळ द्या, असा सल्ला आठवले यांनी कॉक्रोच जनता पक्षाला दिला.

सध्याच्या काळात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात सुसंवाद शिल्लक राहिलेला नाही. वास्तविक सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामुळेच लोकशाहीला पूर्णत्व येते. दोघांनीही एकत्रितपणे काम करणे लोकशाहीमध्ये अपेक्षित आहे. सरकारच्या चांगल्या कामांचे विरोधकांनी स्वागत केले पाहिजे. त्याचप्रमाणे विरोधकांनी आपल्या मागण्या आणि मते सत्ताधाऱ्यांसमोर संवादातून मांडली पाहिजेत. सत्ताधाऱ्यांनी ती समजून घेतली पाहिजे, असेही आठवले यांनी नमूद केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा संसदेत उपस्थित राहत नाहीत, हा विरोधकांकडून केलेला आरोप निरर्थक असल्याचे आठवले यांनी सांगितले. शहा हे अत्यंत कार्यक्षम गृहमंत्री आहेत. सभागृहात ज्या मंत्राच्या विभागाशी संबंधित कामकाज होणार असते त्या मंत्र्यानेच उपस्थित राहणे अपेक्षित आहे. ही जबाबदारी अमित शहा यांच्याकडून काटेकोरपणे पार पाडली जात आहे. असे असतानाही त्यांच्यावर अनुपस्थितीचा आरोप करणे चुकीचे असल्याचे मत आठवले यांनी व्यक्त केले.

**माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना टाळण्यासाठी**

वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सहा आणि दहा वर्षाच्या चिमुकल्यांवर अत्याचाराची अत्यंत अमानुष घटना घडली आहे. पीडित कुटुंबाची आपण भेट घेऊन रिपब्लिकन पक्षाच्या वतीने त्यांना 51 हजारची मदत केली आहे. याशिवाय लवकरच सामाजिक न्याय विभागाच्या वतीने त्यांना दहा लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे, असे आठवले यांनी सांगितले. अशा प्रकारच्या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना समाजात वारंवार घडत असून त्या घडू नयेत यासाठी राजकीय नेते, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि एकूण समाजानेच पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी अपेक्षाही आठवले यांनी व्यक्त केली.

इथेनॉल मिश्रित पेट्रोलवरून केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या राजीनामाची मागणी करणेही चुकीचे असल्याचे आठवले म्हणाले. सरकारने शेतकऱ्यांना वाढीव उत्पन्न मिळावे यासाठी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांच्या गाड्या बंद पडाव्या यासाठी नाही. इथेनॉलमुळे गाड्यांमध्ये बिघाड होत असेल तर त्याबाबत काटेकोर तांत्रिक तपासणी करण्यात यावी व आवश्यकता वाटल्यास इथेनॉल मिसळण्याचा निर्णय मागे घ्यावा. त्या बाबीवरून गडकरी यांच्यासारख्या कार्यक्षम आणि धडाडीच्या मंत्र्यांचा राजीनामा मागणे साफ चुकीचे आहे, असे आठवले म्हणाले. सध्या विविध समाजांच्या आरक्षणाच्या मागण्या वाढत असतानाच दुसरीकडे आरक्षण रद्द करावे, या मागणीसाठी देखील आंदोलने होत आहेत. आरक्षण हा समाजातील वंचित घटकांचा हक्क आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे भटके विमुक्त आणि आदिवासी समाजाला प्रथम आरक्षण मिळाले. मंडल आयोगाने इतर मागास प्रवर्गाला आरक्षण देण्याची शिफारस केली. ती अमलात आली. मराठा समाजाला ही आरक्षण मिळावे अशी रिपब्लिकन पक्षाची मागणी आहे. तसेच सवर्ण समाजातील ज्या कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखांच्या आत आहे, अशा सर्वांनाही आरक्षण मिळावे अशी आपली मागणी आहे. आरक्षण हटाव ही मागणी घटना विरोधी आहे. त्यामुळे अशी मागणी करणाऱ्यांना थांबवणे गरजेचे आहे, असेही आठवले यांनी सांगितले.

केंद्रात व राज्यात सरकार कोणतेही असले तरी नीट सारख्या परीक्षांमध्ये पेपर फुटीचे प्रकार वारंवार घडले आहेत. केंद्र सरकारने परीक्षा पद्धती काटेकोर करण्यासाठी नवीन कायदा आणला आहे. मात्र, यासाठी केवळ कायदा करणे पुरेसे नाही तर कायद्याची कठोर अंमलबजावणी करणारी यंत्रणा तयार होणे अधिक गरजेचे आहे, अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर गुंगी गुडिया अशा शब्दात काँग्रेसने केलेली टीका अत्यंत अयोग्य असल्याचे मत आठवले यांनी व्यक्त केले. सुनेत्रा पवार या माझी ज्येष्ठ मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या कन्या आहेत. अजित पवारांच्या राजकीय आणि सामाजिक कारकीर्द त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांना राजकारणाचा दांडगा अनुभव आहे. मात्र, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या धक्क्यातून त्या अद्याप बाहेर आलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत त्यांच्यावर केलेली ही टीका निंदनीय आहे, असे ते म्हणाले.

एकेकाळी इंदिरा गांधी यांची देखील गुंगी गुडिया याच शब्दाने अवहेलना करण्यात आली. मात्र, पुढे जाऊन इंदिरा गांधी यांनी एक कणखर पंतप्रधान म्हणून आपली प्रतिमा सिद्ध केली, याची आठवणही आठवले यांनी करून दिली.